रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १६ ◆ अंक १६१
www.ramprahar.com
# राम प्रहर
गुरुवार, २८ डिसेंबर २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

अंतरंग

कोकण विभागात दीड लाख झाडांची लागवड/२
रायगडमधील पोलीस ठाण्यांची स्मार्ट वाटचाल/५
के. एल. राहुलचे एकाच मैदानात दोनदा शतक/८


## अयोध्या रेल्वे स्टेशनचे नाव आता अयोध्या धाम



**लखनऊ** : अयोध्येत भगवान श्रीरामाच्या प्रतिष्ठापनेपूर्वी येथील अयोध्या जंक्शन रेल्वेस्थानकाचे नाव बदलून 'अयोध्या धाम' जंक्शन करण्यात आले आहे. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी अलिकडेच अयोध्या दौऱ्यावर असताना रेल्वे स्थानकाची पाहणी केली. या वेळी त्यांनी रेल्वेस्थानकाचे अयोध्या धाम नामकरण करण्याबाबत रेल्वे अधिकाऱ्यांशी चर्चा केली होती. अयोध्या जंक्शनच्या नवीन इमारतीचे उद्घाटन करण्यासाठी आणि अयोध्या दिल्ली वंदे भारत ट्रेनला हिरवा झेंडा दाखवण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी शनिवारी (दि. ३०) येणार आहेत. त्यांच्या दौऱ्यापूर्वी अयोध्या जंक्शन रेल्वे स्थानकाचे नाव बदलून अयोध्या धाम जंक्शन करण्यात आले आहे.

# मुस्लीम लीग मसरत आलम गटावर बंदी

### केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची माहिती




**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

जम्मू काश्मीरमध्ये राष्ट्रविरोधी कारवायांमध्ये सहभागी असणाऱ्या तसेच दहशतवादी कारवायांचे समर्थन करणाऱ्या मुस्लीम लीग जम्मू काश्मीर (मसरत आलम गट) या संघटनेवर बंदी घालण्यात आली आहे. गृहमंत्रालयाने यासंबंधीची अधिसूचना जारी केली आहे.

या अधिसूचनेनुसार, मसरत आलम भट याच्या अध्यक्षतेखालील एमएलजेके-एमए या संघटनेचे सदस्य काश्मीरमध्ये पाकिस्तानचा प्रचार करतात. काश्मीरला भारतापासून वेगळे करून पाकिस्तानमध्ये विलीन करणे व जम्मू काश्मीरमध्ये इस्लामिक राजवट निर्माण करणे हे या संघटनेचे उद्दीष्ट असल्याचे सांगितले जाते.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी मुस्लीम लीग मसरत आलम गटावरील कारवाईची माहिती दिली आहे. त्यांनी म्हटले आहे की, भारत सरकारने मुस्लीम लीग जम्मू काश्मीर (मसरत आलम गट) एमएलजेके-एमए ही संघटना बेकायदेशीर असल्याचे घोषित केले आहे. ही संघटना आणि त्यांचे सदस्य जम्मू काश्मीरमध्ये राष्ट्रविरोधी आणि फुटीरतावादी कारवाया करीत आहेत. ते दहशतवादी कारवायांचे समर्थन करतात. जम्मू काश्मीरमध्ये इस्लामवादी राजवट स्थापन करण्यासाठी चिथावणीखोर वक्तव्ये करतात. ही कारवाई म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील सरकारचा मोठा आणि स्पष्ट संदेश आहे. आपल्या राष्ट्राची एकता, सार्वभौमत्व आणि अखंडतेच्या विरोधात काम करणाऱ्या कोणालाही आम्ही सोडणार नाही. अशा कारवाया करणाऱ्या प्रत्येकाला आपल्या कायद्याचा सामना करावा लागेल, असा इशाराच त्यांनी दिला आहे.

# लोकसभा निवडणुकीसाठी भाजपची विशेष रणनिती

### उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे फेब्रुवारीपासून मॅरेथॉन दौरे




**मुंबई : प्रतिनिधी**

आगामी २०२४च्या लोकसभा निवडणुकीसाठी भाजपने विशेष रणनिती आखली आहे. लोकसभा निवडणुकीत राज्यातील ४५हून अधिक जागा जिंकण्याचा निर्धार भाजपने केला आहे. त्या अंतर्गत राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस राज्यभर मॅरेथॉन दौरे करणार आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम लवकरच तो जाहीर करण्यात येणार आहे.

आगामी २०२४च्या लोकसभा निवडणुकीसाठी भाजपने कंबर कसली आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रचाराच्या मैदानात उतरणार असून ते फेब्रुवारीपासून दररोज तीन सभा घेणार आहेत. महायुतीच्या आमदार आणि खासदारांसोबत उपमुख्यमंत्री फडणवीस प्रचार करणार आहेत. केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी भाजपने कंबर कसली आहे. त्याचाच एक भाग म्हणून उत्तर प्रदेशनंतर मोठे राज्य असलेल्या महाराष्ट्रावर भाजपने लक्ष केंद्रीत केले आहे.

महाराष्ट्रात लोकसभेच्या ४८ जागा आहेत. त्यापैकी महायुतीने ४५पेक्षा जास्त जागा जिंकण्याचा निर्धार केला आहे. त्याचाच एक भाग म्हणून भाजपने फेब्रुवारीपासून राज्याच प्रचाराला सुरुवात करण्याचे निश्चित केले आहे. राज्यातील भाजपचा चेहरा असलेले उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यानिमित्ताने राज्यभर दौरे करणार आहेत.

राज्याचे उपमुख्यमंत्री आणि भाजपचे नेते देवेंद्र फडणवीस यांनी काही दिवसांपूर्वी आलेल्या सर्व्हेवरही प्रतिक्रिया दिली आहे. मी प्रत्येक सर्व्हेचा सन्मान करतो, पण कोणताही सर्व्हे असो फक्त पंतप्रधान मोदीजींचीच हवा असणार आहे. जनतेने ठरवले आहे पंतप्रधान मोदींनाच निवडून द्यायचे. त्यामुळे आम्ही ४०पेक्षा जास्त जागांवर विजयी होऊ, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला, तर अशा प्रकारच्या सर्व्हेला कोणताही आधार नसतो, पाच राज्यांचे निकाल आठवा, अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री व राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांनी दिली आहे.

तीन राज्यांमध्ये यशस्वी ठरलेली रणनिती वापरून भाजप जानेवारीच्या अखेरपर्यंत लोकसभा निवडणुकीसाठीची पहिली उमेदवार यादी जाहीर करेल. लोकसभा निवडणुकीसाठीच्या तारखा फेब्रुवारी किंवा मार्चमध्ये जाहीर होऊ शकतात. त्याच्या एक ते दीड महिन्याआधीच भाजप उमेदवार यादी जाहीर करेल, असा अंदाज व्यक्त होत आहे.

## दिल्लीतील इस्रायल दूतावासाजवळ स्फोट

### दोन संशयित सीसीटीव्हीत कैद; शोध सुरू

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

नवी दिल्लीतील चाणक्यपुरी परिसरात असलेल्या इस्रायली दूतावासाच्या मागे एका इमारतीतल्या रिकाम्या फ्लॅटमध्ये मंगळवारी (दि. २६) रात्री मोठा स्फोट झाला.

दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलचे एक पथक या प्रकरणाचा तपास करीत आहे. स्फोटानंतर स्पेशल सेलचे पथक आणि बॉम्बशोधक पथकाने दोन-तीन तास संपूर्ण परिसरात शोधमोहीम राबवली, परंतु स्फोटाशी संबंधित कोणतीही गोष्ट पोलिसांच्या हाती लागली नाही. केवळ स्फोट झालेल्या ठिकाणापासून काही अंतरावर एक पत्र सापडले. या पत्रात इस्रायली दूतावासाच्या राजदूतांचा उल्लेख करण्यात आला आहे, तसेच या पत्रात एक झेंडादेखील गुंडाळण्यात आला होता. पोलिसांनी या पत्राच्या अनुषंगानेदेखील तपास सुरू करण्यात आला आहे.

दरम्यान, पोलिसांनी या परिसरात असलेले सर्व सीसीटीव्ही कॅमेरे तपासले. यामध्ये पोलिसांना दोन संशयित व्यक्ती आढळल्या आहेत. एनएसजी आणि एनआयएची दोन पथके तसेच दिल्ली पोलीस या दोन व्यक्तींचा शोध घेत आहेत.

## कृषी उत्पादकांवर लागणार विशिष्ट कोड

### ■ यांत्रिकीकरण योजनेतील गैरप्रकार रोखण्यासाठी उपाय

**मुंबई : प्रतिनिधी**

शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी शेतीपूरक यंत्रसामग्री खरेदी करण्यास प्रोत्साहित करणे आणि त्याद्वारे कृषी यांत्रिकीकरणास प्रोत्साहन देण्यासाठी कृषी यांत्रिकीकरण योजना फार महत्त्वाकांक्षी ठरली आहे, मात्र मधल्या काळात अनुदानात गैरप्रकार होत असल्याचे निदर्शनात आले. हे प्रकार रोखण्यासाठी कृषी विभागाने आता नवा उपाय शोधून काढला आहे.

यामध्ये यांत्रिकीकरण योजनांच्या माध्यमातून अनुदानावर अवजारांचा पुरवठा करणाऱ्या उत्पादकांना सेंट्रलाईज्ड कोडिंग सिस्टीमवर नोंदणी करणे बंधानकारक केल्याचे निर्देश दिले आहेत.

ही प्रक्रिया आगामी ३० मार्च २०२४पर्यंत पूर्ण न केल्यास १ एप्रिलपासून अवजारे अनुदानासाठी अपात्र ठरतील, असा इशाराही देण्यात आला आहे.

कृषी यांत्रिकीकरण योजनेत ज्या अवजाराची किंमत एक लाख रुपयांपेक्षा जास्त असेल त्यांनी अवजाराच्या मुख्य फ्रेमवर लेझर कटिंग वापरून सिरीयल नंबर टाकावा लागेल, तसेच ज्या अवजारावर हे शक्य नाही त्यावर सिरीयल नंबर प्लेट वेल्डिंग करून लावावी लागणार आहे. ज्या अवजारांची किंमत एक लाखांपेक्षा कमी आहे, अशा अवजारांच्या मुख्य फ्रेमवर सिरीयल नंबर कोरणे बंधनकारक करण्यात आले आहे. जी अवजारे प्लॅस्टिक किंवा इतर फायबर, प्लॅस्टिकची आहेत आणि ज्यावर लेझर कटिंग करणे शक्य नाही, अशा अवजारांवर सिरीयल नंबर कोरावा लागणार आहे.

यासंबंधीची कार्यवाही ३० मार्च २०२४पर्यंत कृषी औजारे व मशिनरी उत्पादकांनी पूर्ण करावी लागेल. दिलेल्या वेळेत असे न केल्यास त्यानंतर १ एप्रिल २०२४पासून अनुदान योजनांमध्ये अशा अवजारांचा समावेश केला जाणार नाही, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.

## निवडक

### नववर्षात 'इस्रो' उलगडणार ब्लॅक होलचे रहस्य

**थिरूवनंतपूरम** : इस्रोने सूर्यमालेतील रहस्य जाणण्यासाठी एक नवीन मोहीम सुरू केली आहे. या मिशनच्या माध्यमातून ब्लॅक होल्स आणि न्यूट्रॉन स्टार्सचा अभ्यास केला जाईल. हे देशाचे पहिले एक्स-रे पोलारीमीटर सॅटेलाईट (एक्सपोसॅट) असेल, जे १ जानेवारीला रवाना होईल. इस्रोने दिलेल्या माहितीनुसार, एक्सपोसॅट मिशनचा उद्देश विश्वातील ५० सर्वांत चमकदार ज्ञात स्त्रोतांचा अभ्यास करणे असा आहे.

### पुण्यातील विमाननगरमध्ये १० सिलिंडरचा स्फोट

**पुणे** : पुण्यातील विमाननगरच्या सिंबोयसेस कॉलेजजवळ, रोहन मिथिला इमारतीलगत जवळपास १० सिलिंडरचा स्फोट झाला. अग्निशमन दलाकडून आग आटोक्यात आणण्यात आली. बांधकाम सुरू असलेल्या एका इमारतीत बेकायदेशीररित्या सिलिंडरचा साठा ठेवण्यात आला होता. एकूण १०० सिलिंडरपैकी १० सिलिंडरचा स्फोट झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. सुदैवाने आगीत कुठलीही जीवितहानी झाली नाही.

## रोह्यातील युनिकेम कंपनीविरोधात गेटबंद आंदोलन करणार

### ■ भाजप तालुकाध्यक्ष अमित घाग यांची माहिती

**धाटाव, रोहे : प्रतिनिधी**

प्रदूषण आणि कामगारांच्या सुरक्षेबाबत हलगर्जीपणा तसेच स्थानिकांना कामे देण्यास टाळाटाळ करणाऱ्या युनिकेम लॅबोरेटरीज कंपनीविरोधात भाजपचे मावळ लोकसभा प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली व दक्षिण रायगड अध्यक्ष धैर्यशील पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत ४ जानेवारीपासून गेटबंद आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती भाजपचे रोहा तालुकाध्यक्ष अमित घाग यांनी बुधवारी (दि. २७) आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत दिली.

अमित घाग यांनी पत्रकारांना अधिक माहिती देताना पुढे सांगितले की, धाटाव औद्योगिक वसाहतीत बहुचर्चित युनिकेम लॅबोरेटरीज या केमिकल कंपनीमध्ये स्थानिकांना कामे मिळावीत यासाठी आम्ही वारंवार पाठपुरावा करीत आहोत. त्याचबरोबर प्रदूषण नियंत्रण आणि कंपनीतील कामगारांच्या सुरक्षेबाबतसुद्धा वारंवार चर्चा केली आहे, मात्र कंपनीचे व्यवस्थापन स्थानिक लोकप्रतिनिधींच्या दबावापोटी सर्वसामान्यांवर अन्याय करीत आहे. या कंपनीत २०० हून अधिक कंत्राटी कामगार आहेत. **(पान २ वर..)**



**खासदार सुनील तटकरे कंत्राटी कामगारांच्या समस्या सोडविण्याबाबत कधीही बोलत नाहीत आणि स्थानिक तरुणांना मिळणाऱ्या छोट्या-मोठ्या कंत्राटांमध्येदेखील तटकरेंच्या दबावाखाली कंपनी व्यवस्थापन बळी पडत असल्याने स्थानिकांना कामापासून अडवले जात आहे. त्यांच्या या प्रकारामुळे सुरू असलेल्या मूळच्या ४० ते ५०पैकी आता फक्त ३० कंपन्या सुरू राहिल्या आहेत आणि उरलेल्या कंपन्यांना नामशेष करण्याच्या मार्गावर ते आहेत. रोहा तालुक्यात वापरायचा सीआरएस फंड कंपन्यांना भीती दाखवून तालुका व जिल्हा बाहेर नेण्याचे प्रकार करून तालुक्याला अपेक्षित विकासापासून वंचित ठेवण्याचाही त्यांचा धडाका निषेधार्ह आहे.**
**-अमित घाग, अध्यक्ष, भाजप, रोहा**

## महाराष्ट्रात देशातील पहिला मध महोत्सव

**मुंबई : प्रतिनिधी**

मध उद्योगाची व्याप्ती वाढावी, ग्रामीण अर्थकारणाला चालना मिळावी, या उद्देशाने देशातील पहिलाच मध महोत्सव-२०२४ महाराष्ट्रात आयोजित करण्यात येत आहे. त्याचे पहिले आयोजन मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे १८ व १९ जानेवारीला होत असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाचे सभापती रवींद्र साठे यांनी दिली.



फोर्ट येथील मंडळाच्या कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. साठे म्हणाले की, मधमाशी ही केवळ मध व मेण एवढ्यापुरतेच मर्यादित नसून मोठ्या प्रमाणात परागीभवनाद्वारे शेती उत्पादनात वाढ करते. राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ मधाचे उत्पादन वाढण्यासाठी विविध योजना राबविते. यामध्ये प्रामुख्याने मध केंद्र योजना तसेच मधाचे गाव या नावीन्यपूर्ण संकल्पनांचा समावेश आहे.

मधमाशापालनातील उत्पादनांची माहिती व विक्रीसाठी प्रदर्शन भरविण्यात येणार आहे. त्यात विविध मधपाळांचे २० स्टॉल उभारण्यात येणार आहेत. या कार्यक्रमाचे उद्घाटन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते होणार आहे.

## नागोठणे पोलीस ठाण्याच्या नवीन इमारतीचे उद्घाटन

### गुन्हेगारांवर वचक निर्माण करावा- मंत्री उदय सामंत



**रायगड : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यातील नागोठणे पोलीस ठाण्याच्या नवीन प्रशासकीय इमारतीचे उद्घाटन राज्याचे उद्योगमंत्री तथा पालकमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते बुधवारी (दि. २७) झाले. पोलिसांविषयी जनतेच्या मनात आदरयुक्त भीती आहे. याप्रमाणेच गुन्हेगारांवर वचक निर्माण करा, असे पालकमंत्री उदय सामंत यांनी या वेळी सांगितले.

नागोठणे येथे आयोजित या कार्यक्रमास आमदार अनिकेत तटकरे, आमदार महेंद्र थोरवे, आमदार महेंद्र दळवी, विशेष पोलीस महानिरीक्षक प्रवीण पवार, जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे, जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, उपवनसंरक्षक राहुल पाटील आदी उपस्थित होते.

मंत्री सामंत पुढे म्हणाले की, रायगड पोलीस विभागाने ड्रग्ज पकडण्याची केलेली कामागिरी कौतुकास्पद असून यासाठी रायगड पोलिसांचे विशेष अभिनंदन करतो. वाईट प्रवृत्तींबाबत पोलीस आणि नागरिकांनी दक्ष राहिले पाहिजे. समाजातील ड्रग्ज आणि सावकारी समूळ नष्ट झाले पाहिजे, यासाठी सर्वांनी प्रयत्न करायला हवेत, असे आवाहन त्यांनी केले. **(पान २ वर..)**

## पनवेल शहरातील कोळीवाड्यात सेल्फी पाईंटसह विविध कामांचे भूमिपूजन

### ■ माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते शुभारंभ




(छाया : अक्षय शार्दुल)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सौजन्याने पनवेल कोळीवाड्यात माझा कोळीवाडा सेल्फीपॉईंट उभारण्यात येणार आहे. या सेल्फी पाईंटसह विविध कामांचे भूमिपूजन बुधवारी (दि. २७) महापालिकेचे माजी सभागृह नेते तथा मंडळाचे सेक्रेटरी परेश ठाकूर यांच्या हस्ते झाले.

श्री. रामशेठ ठाकूर सामजिक विकास मंडळातर्फे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली सामाजिक कार्य सुरू आहे. त्यानुसार पनवेल कोळीवाड्यात मंडळाच्या वतीने माझा कोळीवाडा हा सेल्फी पाईंट उभारण्यात येणार आहे.

या वेळी माजी नगरसेवक राजू सोनी, माजी नगरसेविका दर्शना भोईर, रुचिता लोंढे, भाजपचे प्रभाग क्रमांक १९चे अध्यक्ष पवन सोनी, मच्छिमार सेलचे पनवेल अध्यक्ष हारु भगत, पनवेल शहर युवा मोर्चा अध्यक्ष सुमीत झुंझारराव, केदार भगत, दत्ता पाटील, किरण भोईर, सचिन भगत, विजय पाटील, वसंत गोवारी, एकनाथ भोईर, कमलाकर कोळी, गजानन भगत यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि कोळी बांधव उपस्थित होते.



**पनवेल : भाजप युवा मोर्चाच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची बुधवारी भेट घेऊन आशीर्वाद घेतले. भाजप युवा मोर्चा उत्तर रायगड सरचिटणीस अभिषेक भोपी, उपाध्यक्ष ॲड. चिन्मय समेळ यांच्यासह इतर नियुक्त पदाधिकाऱ्यांचे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अभिनंदन केले तसेच पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी भारतीय जनता युवा वॉरियर्स रायगड जिल्हा सहसंयोजक यश भोईर, युवा मोर्चाचे कार्यकारिणी सदस्य शशिकांत इंगळे, मन की बात, सरल व नमो ॲप तसेच नमो राजदूत संयोजक ऋषिकेश साबळे, सचिन सातपुते, महेश कापसे, गणेश भारद्वाज, अमित खरात, प्रशांत पवार, बालाजी सानप, अविनाश वारे, विनोद सिंग आदी उपस्थित होते.** (छाया : योगेश पाटील)

# कोकण विभागात दीड लाख झाडांची लागवड

## वन विभागाने दिली माहिती

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त वन विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या नाविण्यपूर्ण योजनांतर्गत कोकण विभागातील २७.४५ हेक्टर जमिनीवर 'बेलवन', 'अमृतवन', 'पंचायतवन', 'मियावाकी', वनांच्या लागवडी अंतर्गत २०२३-२४ या वर्षात एक लाख ३४ हजार ४९० झाडांची लागवड अतिरिक्त करण्यात आली असल्याची माहिती वन विभागामार्फत देण्यात आली आहे.

वृक्षसंवर्धन आणि वृक्ष लागवडीसाठी शासनामार्फत बेलवन, अमृतवन, पंचायतवन आणि मियावाकी वन निर्मितीचे काम हाती घेण्यात आले होते. अमृत महोत्सवी वर्ष साजरे करतांना वन विभागामार्फत धार्मिक स्थळांच्या ठिकाणी 'बेलवन' उद्यानांची निर्मिती करून बेल वृक्षाची पाने, मुळे, फळे व साल या सर्वांचा विविध मार्गातून उपयोग व्हावा. या बेलवनातून धार्मिक स्थळांच्या ठिकाणी येणाऱ्या भाविकांना उपयुक्त असणाऱ्या औषधी वनस्पती जसे की, बेल, सीता अशोक, रुद्राक्ष, बोर, पळस, पारिजात, पांढरा चाफा, पांढरी कण्हेर या वृक्षांचा उपयोग होणार आहे. कोकण विभागातील ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्हयातील एकूण २.६० हेक्टर क्षेत्रावर एकूण एक हजार ४० बेल व इतर वृक्षांची लागवड करण्यात आली आहे. बेल वृक्षाचे धार्मिक महत्त्व लक्षात घेता या योजनेमुळे बेलपानांची मागणी वाढली आहे.



अमृतकाळाच्या सुरुवातीस अमृतुल्य मानल्या जाणाऱ्या औषधी वनस्पती, दुर्मीळ वनस्पतींची व इतर महत्त्वपूर्ण वृक्षांची लागवड करून अमृत वन, पंचायत वन आणि मियावाकी वनांच्या निर्मितीमुळे शहरी भागातील औद्योगीकरण, नागरीकरण वाढती लोकसंख्या इत्यादीमुळे वाढते प्रदूषण आणि तापमानात होणारी वाढ या सर्वांचा मानवी जीवनावर होणारा विपरित परिणाम कमी मदत करण्यास होईल.

कोकण विभागातील ठाणे आणि रत्नागिरी जिल्हयातील एकूण ३.०० हेक्टर भू भागावर एकूण एक हजार २०० वृक्षांची लागवड करून अमृत वन तयार करण्यात आली आहेत. तसेच कोकण विभागातील ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्हयातील एकूण १७.५० हेक्टर भू भागावर एकूण एक हजार ७५० वृक्षांची लागवड करून पंचायत वन तयार करण्यात आली आहेत. रायगड जिल्हयात ४.३५ हेक्टर क्षेत्रावर एक लाख ३० हजार ५०० वृक्षांची लागवड करून मियावाकी वन तयार करण्यात आली आहेत.

## अग्निशमन केंद्रात जुगार खेळणारे कर्मचारी निलंबित



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

मद्य प्राशन करून जुगार खेळल्याच्या आरोपाप्रकरणी नवी मुंबई महानगरपालिकेच्या कोपरखैरणे अग्निशमन केंद्रातील पाच अग्निशमन कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे, अशी माहिती आयुक्त राजेश नार्वेकर यांनी दिली.

नवी मुंबई महापालिकेच्या कोपरखैरणे अग्निशमन केंद्रातील पाच अग्निशमन कर्मचारी कामावर असतांना मद्य प्राशन करून जुगार खेळत असल्याचा व्हिडिओ समाज माध्यमातून प्रसारित झाला होता. याची नोंद घेत प्रशासन विभागाने संबंधित कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली होती. तसेच त्यांना खुलासा सादर करण्याचे आदेश दिले होते.

संबंधित कर्मचाऱ्यांनी याविषयी सादर केलेला खुलासा समाधानकारक नसल्याने तो अमान्य करत करण्यात आला. तसेच त्यांना निलंबित करून त्यांची विभागीय चौकशी ही प्रस्तावित करण्यात आली आहे. या चौकशीमध्ये सदर कर्मचाऱ्यांनी असा प्रकार केला होता की नाही हे निष्पन्न होणार आहे. निलंबित केलेल्या कर्मचाऱ्यांमध्ये सचिन शिंदे, अक्षय सिसोदे, विनोद देठे, विनोद गायकवाड, हेमंत भरसट यांचा समावेश आहे.

# डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रवेशद्वाराचे होणार लोकार्पण

## सचिन धर्माधिकारी यांना निमंत्रण



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत शहराचे प्रवेशद्वार म्हणून कर्जत नगर परिषदेकडून विकसित करण्यात आलेल्या प्रवेशद्वाराचे लोकार्पण ७ जानेवारी रोजी होणार आहे. थोर निरुपणकार डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रवेशद्वार कर्जत नगर परिषद असे नाव असलेली स्वागत कमान राज्य शासनाच्या निधीमधून बांधण्यात आली आहे. या स्वागत कमानीचे उद्‌घाटनावेळी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची प्रमुख उपस्थितीत राहणार आहे.या सोहळ्याला निरुपणकार सचिन धर्माधिकारी यांची प्रमुख उपस्थितीत राहणार असून कर्जतचे आमदार महेंद्र थोरवे यांनी रेवदंडा येथे जाऊन त्यांना निमंत्रण दिले. सचिनदादा धर्माधिकारी यांनी कर्जत येथे येण्याचे निमंत्रण स्वीकारले असल्याची माहिती शिवसेनेकडून देण्यात आली आहे.

कर्जत शहराचे प्रवेशद्वार राज्याच्या नगरविकास विभागाच्या निधीमधून बांधण्यात येत आहे. या प्रवेशद्वाराचे भूमिपूजन खासदार श्रीरंग बारणे आणि आमदार महेंद्र थोरवे यांच्या उपस्थितीत झाले होते. तब्बल ८६ लाखांचा निधी भव्य अशा स्वागत कमानीचे उभारणी पूर्ण झाली असून थोर निरुपणकार डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रवेशद्वार कर्जत नगर परिषद असे नाव देण्यात आले आहे. या प्रवेशद्वाराचे लोकार्पण ७ जानेवारी रोजी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे हस्ते होणार आहे. या कार्यक्रमाला निरुपणकार सचिन धर्मधिकारी यांनी यावे, अशी विनंती कर्जतचे आमदार महेंद्र थोरवे यांनी रेवदंडा येथे जाऊन केली. सचिन धर्माधिकारी यांनी ७ जानेवारी रोजी कर्जत येथे येण्याचे निमंत्रण स्वीकारले असल्याचे शिवसेनेकडून सांगितले जात आहे. या भेटीच्या वेळी कर्जत पंचायत समितीचे माजी उपसभापती मनोहर थोरवे, कर्जत नगर परिषदेचे नगरसेवक संकेत भासे तसेच प्रसाद थोरवे हे उपस्थित होते.

कर्जत येथे ७ जानेवारी रोजी सचिनदादा धर्माधिकारी यांची उपस्थिती राहणार असेल तर मात्र कर्जत नाना मास्तर नगर परिसर श्री सदस्यांच्या गर्दीने ओसंडून गेलेला असेल, असे सांगण्यात येत आहे.

# मुरूडमध्ये चार दिवस रंगणार पर्यटन महोत्सव

## थर्टी फर्स्टनिमित्त गौतमी पाटील असणार विशेष आकर्षण

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड नगर परिषदेचा पर्यटन महोत्सव जल्लोषात साजरा होणार असून विविध करमणूक प्रदान कार्यक्रमाची मोठी रेलचेल असणार आहे. ३१ डिसेंबर रोजीच्या सायंकाळच्या कार्यक्रमासाठी प्रसिद्ध लावणी नृत्य करणाऱ्या गौतमी पाटील यांचा विशेष कार्यक्रम आयोजित केल्याने प्रेक्षांचा महापूर या ठिकाणी ओसंडून वाहणार आहे. पर्यटन महोत्सव साजरा करण्यासाठी मुरूड नगर परिषदेमध्ये एका विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मुरूड शहरातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.



या वेळी व्यासपीठावर माजी नगराध्यक्षा स्नेहा पाटील, मुख्याधिकारी पंकज भुसे, माजी नगराध्यक्षा कल्पना पाटील, माजी नगरसेवक संदीप पाटील, माजी नगराध्यक्ष मंगेश दांडेकर, वीरेन भगत, मुरुड तालुका सुपारी खरेदी विक्री संघाचे चेअरमन अविनाश दांडेकर, माजी पाणी पुरवठा सभापती पांडुरंग आरेकर आदी उपस्थित होते.

या वेळी उपस्थित मान्यवरांना आवाहन करण्यात आले की, पर्यटन महोत्सवासाठी सर्व लोकांनी सहकार्य करून होणारे कार्यक्रम यशस्वी करावे.यासाठी विविध कमिट्या सुद्धा गठीत करण्यात आल्या आहेत. या वेळी उपस्थित मान्यवर यांनीसुद्धा विविध सूचना मांडून कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. या वेळी शिवसेनेचे मुरूड शहर अध्यक्ष संदीप पाटील यांनी अलिबाग-मुरूड विधानसभा क्षेत्राचे आमदार महेंद्र दळवी यांनी पर्यटन महोत्सव संपन्न होण्यासाठी सर्व आर्थिक बाजू सांभाळून मोलाचे योगदान दिल्यामुळे हा कार्यक्रम आपण सर्वानी मिळून यशस्वी करूया, असे उपस्थितांना आवाहन केले.

मुख्याधिकारी पंकज भुसे यांनी सर्व राजकीय पक्षांनी मतभेद विसरून हा पर्यटन महोत्सव आपलाच आहे असे समजून मोलाचे सहकार्य करून नगरपरिषदेस सहकार्य करावे. यावेळी पर्यटन महोत्सव अध्यक्ष पदासाठी माजी नगराध्यक्षा कल्पना पाटील यांचे नाव अंतिम करण्यात आले तर उपाध्यक्ष म्हणून माजी नगरसेवक प्रकाश सरपाटील व वीरेन भगत यांची निवड करण्यात आली आहे.

### ■ विविध कार्यक्रमांची रेलचेल, स्थानिक कलाकारांचा होणार सन्मान

*२९ डिसेंबर रोजी सायंकाळी ४ वाजता बैलगाडी स्पर्धा, सायंकाळी ५ वाजता पर्यटन शोभा यात्रा, सायंकाळी ६ वाजता पैठणी स्पर्धा, रात्री ८ वाजता शिवसेनेचे रायगड जिल्हा संपर्क प्रमुख प्रकाश देसाई पुरस्कृत गर्जा महाराष्ट्र ऑर्केष्ट्राहोणार आहे. ३० डिसेंबर रोजी सकाळी ७ वाजता मुरूड शहर मर्यादित मॅरेथॉन स्पर्धा, सकाळी ११ वाजता मुरूड तालुका मर्यादित कबड्डी स्पर्धा, सायंकाळी ६ वाजता शालेय नृत्य स्पर्धा,रात्री ८ वाजता मुरुड नगरपरिषद पुरस्कृत धुमाकूळ ऑर्केस्ट्रा संपन्न होणार आहे. ३१ डिसेंबर सायंकाळी ६ वाजता सुरेश सदरे प्रस्तुत कराओके संगीत मनोरंजन कार्यक्रम, रात्री ८ वाजता प्रसिद्ध नृत्यांगना गौतमी पाटील यांचा लावणी मनोरंजात्मक कार्यक्रम होणार आहे. रात्री १२ वाजता नवीन वर्षाचे आगमन फटाक्याची आतिषबाजी असणार आहे. १ जानेवारी रोजीसायंकाळी ६ ते ८ वाजता मुरूड शहरातील स्थानिक कलाकारांचा सन्मान सोहळा तदनंतर रात्री १० वाजता कव्वालीचा बहारदार कार्यक्रम होणार आहे.*

# उरणमध्ये श्री दत्तजयंती उत्साहात

## महेश बालदी मित्र मंडळातर्फे महाप्रसाद

**उरण : वार्ताहर, बातमीदार**

दत्त जयंतीनिमित्त उरण परिसरातील चिरनेर, मोरा आदी विविध ठिकाणची दत्त मंदिरे भाविकांच्या गर्दीने फुलून गेली होती. शहरातील दत्तजयंती निमित्ताने भरलेल्या यात्रेला रविवारी मध्यरात्रीपासूनच भाविकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी झाली.

यात्रेत विविध दुकाने थाटण्यात आली आहेत. यामुळे सध्या तरी उरणची यात्रा गर्दीमुळे हाऊसफुल्ल झाली आहे. दत्त जयंती उत्सवात दत्त मंदिर जवळ महेश बालदी मित्र मंडळ व देऊळवाडी युवक मित्र मंडळ यांच्या वतीने मंगळवारी दुपारी १२ ते दुपारी ३ वाजेपर्यंत भक्तांसाठी महा प्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. सुमारे चार हजार भक्तांनी याचा लाभ घेतला.

या वेळी आमदार महेश बालदी उरण तालुका भाजप अध्यक्ष रवी भोईर, उरण भाजप शहर अध्यक्ष कौशिक शाह, माजी नगराध्यक्ष सायली म्हात्रे, उपनगराध्यक्ष जयविन कोळी, उरण शहर युवा अध्यक्ष निलेश पाटील, हितेश शाह, मनन पटेल, उद्योजक सुनील पेडणेकर, अजित भिंडे, माजी नगरसेवक राजेश ठाकूर, नंदू लांबे, मनोहर सहतीया, राजेश कोळी, मदन कोळी, निरंतर नार्वेकर, देवेंद्र घरत, निलेश कदम, माजी नगरसेविका आशा शेलार, जानवी पंडित, रजनी कोळी, उरण शहर भाजप महिला अध्यक्ष संपूर्णा थळी, जसीम गॅस आणि सर्व सदस्य त्याचप्रमाणे देऊळवाडी मित्र मंडळ सर्व सदस्य आदी उपस्थित होते.



## कामोठे, खारघर नोडमध्ये शुक्रवारी पाणीपुरवठा बंद

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेच्या मोरबे धरण ते दिघा मुख्य जलवाहिनीवर देखभाल दुरुस्तीची व इतर कामे करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने शुक्रवारी (दि. २९) सकाळी १० ते रात्री १० वाजेपर्यंत भोकरपाडा जलशुद्धीकरण केंद्र येथील पाणीपुरवठा १२ तास बंद ठेवणे गरजेचे आहे. त्यामुळे शुक्रवार संध्याकाळी नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील तसेच कामोठे, खारघर नोडमधील पाणीपुरवठा बंद राहील त्याचप्रमाणे शनिवारी (दि. ३०) कमी दाबाने पाणी पुरवठा होईल, याची कृपया नोंद घेण्यात यावी.

त्या अनुषंगाने नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील व कामोठे, खारघर नोडमधील नागरिकांना या कालावधीत पाण्याचा जपून व काटकसरीने वापर करून नवी मुंबई महापालिकेस सहकार्य करावे, असे जाहीर आवाहन करण्यात आले आहे.

पान १ वरुन

## नागोठणे पोलीस ठाण्याच्या नवीन इमारतीचे उद्‌घाटन

त्याचप्रमाणे रायगड जिल्ह्यातील पोलीस ठाण्यांसाठी निधी मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे सांगून सर्व पोलीस स्टेशन स्मार्ट व्हावेत, यासाठी आवश्यकतेप्रमाणे कार्यवाही करा. राज्यातील पोलीस बँड पथके उत्कृष्ट आहेत. त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी आगामी दोन महिन्यांत महाराष्ट्र पोलीस बँडवादन स्पर्धा रत्नागिरी जिल्ह्यात आयोजित करण्यात येणार असल्याचेही या वेळी सांगितले.

आमदार अनिकेत तटकरे आणि विशेष पोलीस महानिरीक्षक प्रवीण पवार यांची भाषणे झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी तर आभार अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांनी मानले.

## रोह्यातील युनिकेम कंपनीविरोधात गेटबंद आंदोलन करणार

कंपनी कामगारांच्या सुरक्षतेबाबत योग्य काळजी घेत नसल्याच्या तक्रारी आहेत. त्यामुळे या कामगारांसंदर्भात वारंवार कंपनी व्यवस्थापनाशी आम्ही चर्चा करीत आहोत, मात्र याबाबत व्यवस्थापन मनमानी करीत असल्याने ४ जानेवारीपासून गेटबंद आंदोलन करण्यात येणार आहे. जोपर्यंत कामगार व स्थानिकांना न्याय मिळत नाही तोपर्यंत हा लढा सुरूच ठेवणार असल्याचा इशाराही तालुकाध्यक्ष अमित घाग यांनी दिला.

या वेळी भाजपचे आनंद लाड, एकनाथ ठाकूर, कृष्णा बामणे, रवींद्र तारू, विष्णू मोरे, अरुण वाघमारे, महेश ठाकूर, रोशन चाफेकर, नरेश कोकरे, शेखर गोळे, रघुनाथ कोस्तेकर, धनराज उमाळे, सचिन मोदी, रहुप कवडेकर, इम्रान पानसरे, कल्पेश माने, वैभव कुलकर्णी यांसह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## कृषी विभागातर्फे 'जागर पौष्टिक तृणधान्याचा'

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर तालुक्यातील लोहारमाळ, पोलादपूर एसटी बसस्थानक तसेच कापडे बुद्रुक येथील नरवीर तानाजी मालुसरे प्रवेशद्वारासमोर प्रिझम संस्थेमार्फत पोलादपूर तालुका कृषी अधिकारी सूरज पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत कृषी विभागाच्या वतीने'जागर पौष्टिक तृणधान्याचा' हा पथनाट्याद्वारे जनजागृतीचा उपक्रम सादर करण्यात आला.

उत्पादकता वाढीच्या दृष्टीने तसेच पौष्टिक तृणधान्यांमध्ये असलेल्या पोषण मूल्याचे आहारातील महत्त्व पटवून देण्याकरिता लोहारमाळ, पोलादपूर एसटी बसस्थानक तसेच कापडे बुद्रुक या ठिकाणी जनजागृती करण्यात आली.



या वेळी या कार्यक्रमास पोलादपूर तालुका कृषी अधिकारी सूरज पाटील, मंडल कृषी अधिकारी भरत कदम, कृषी पर्यवेक्षक गुंड, कृषी सहायक श्रीराम मोरे, बरखडे, कचरे, काकड आदी कर्मचारी, प्रिझम संस्थेच्या अध्यक्ष तथा राष्ट्रीय युवा पुरस्कारार्थी भारत सरकार तपस्वी नंदकुमार गोंधळी व पथनाटयातील कलाकार नेहा पाटील, तुषार राऊळ, हर्षदा भगत, अश्विनी पारधी, निधी पाटील, नेहा जावसेन, स्नेहा मानकर, दर्श नागोठकर, स्वरूप पाटील व बहुसंख्येने प्रवासी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

**दुखवटा**

## सुशीला कुरघोडे



**पनवेल :** पत्रकार अनिल कुरघोडे यांच्या मातोश्री सुशीला शिवाजी कुरघोडे (वय ८०) यांचे बुधवारी (दि. २७) सकाळी निधन झाले. पनवेल येथील अमरधाम समशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. कै. सुशीलाताई यांचा राख सावरण्याचा विधी गुरुवारी (दि. २८) अमरधाम स्मशानभूमीत होणार आहे. तर दहावे सावरकर चौक, बैलघाट, पनवेल येथे होणार आहे. त्यांच्या अंत्ययात्रेला विविध पक्षाचे राजकीय पुढारी, नातेवाईक, सगे-सोयरे, पत्रकार आणि समाज बांधव या वेळी उपस्थित होते.

## थर्टी फर्स्ट आणि नववर्ष स्वागताचा उत्साह

# बेकायदा दारू विक्रीवर नजर

### उत्पादन शुल्क विभाग सज्ज





**पनवेल : वार्ताहर**

सरत्या वर्षाला निरोप तसेच नववर्षाच्या स्वागतासाठी पनवेल तालुक्यातील हॉटेल्स, परमीटरूम, बिअरबार, ढाबे, डान्स बार सज्ज झाले आहेत. याकाळात अवैधरित्या पार्टी तरीच बेकायदा दारूची विक्री मोठ्या प्रमाणात होत असल्याने उत्पादन शुल्क विभागाची भरारी पथके कारवाईसाठी सज्ज झाली आहेत.

नाताळ आणि नव वर्षाच्या पार्श्वभूमीवर दारूची दुकाने आणि बार पहाटेपर्यंत सुरू ठेवण्यास राज्य गृह विभागाने परवानगी दिली आहे. त्यामुळे बारचालक आणि तळीराम सुखावले आहेत. पनवेल तालुक्यात मद्य विक्रीचा रितसर परवाना असलेली मोठ्या प्रमाणात आस्थापना आहेत, तसेच जिल्ह्यात पनवेल हे मद्याविक्रीचे प्रमुख केंद्र आहे. तालुक्याच्या हदीतील महामार्गालगत असलेले बार आणि ढाबे ग्राहकांनी नेहमीच गजबलेले असतात. मुंबई, पुणे परिसरातून अनेकांची ऊठबस करण्यासाठी ढाब्यांवर जय्यत तयारी केली जाते. त्यामुळे नववर्ष स्वागताच्या निमित्ताने बेकायदा पार्टीवर कारवाई करण्यासाठी उत्पादन शुल्क विभागाने विशेष लक्ष केंद्रित केले आहे. पार्टीचे आयोजन करण्यासाठी एक दिवसाचा परवाना घेणे उत्पादन शुल्क विभागाने बंधनकारक केले आहे.

परवानाधारक दुकानांमधूनच दारू घेण्याचे आवाहन केले आहे. परवानगी नसलेल्या ठिकाणी दारू पिण्यासाठी बसू नये, तसे निदर्शनास आल्यावर दारू विक्री करणाऱ्यावर आणि मद्यपीवर कारवाई केली जाणार आहे. पनवेल शहर व ग्रामीण भाग व परिसर या विभागासाठी पथक नेमले आहे. त्यामुळे बेकायदा दारू विक्री करणाऱ्यांवर करडी नजर असणार आहे.

> **नवीन वर्षाच्या स्वागताच्या निमित्ताने बेकायदा मद्य विक्री आणि पार्टीचे आयोजन करणाऱ्या व्यक्तींवर कडक कारवाई केली जाणार आहे. यासाठी उत्पादन शुल्क विभागाने सात पथके आहेत.**
> **-रविकिरण कोले, जिल्हा उत्पादन शुल्क अधिकारी**

## ओवे डोंगरालगत मातीचे उत्खनन



**खारघर : रामप्रहर वृत्त**

तळोजा मध्यवर्ती कारागृहाच्या मागील बाजूस असलेल्या डोंगराच्या पायथ्याशी सिडकोकडून मोठ्या प्रमाणात रोप लागवड करण्यात आली आहे, मात्र या डोंगरालगत मातीचे उत्खनन केले जात असून तयार केलेल्या रस्त्यामुळे मोठ्या प्रमाणात झाडांची हानी झाली आहे. त्यामुळे पर्यावरणप्रेमींमध्ये नाराजी आहे.

तळोजा मध्यवर्ती कारागृह आणि उरण तालुक्यातील अरबी समुद्राच्या किनाऱ्यावर असलेल्या द्रोणागिरी डोंगराच्या पायथ्याशी मातीचे होत असलेले बेकायदा उत्खनन थांबवण्याचे आदेश जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्यांनी काही महिन्यापूर्वी उपविभागीय अधिकाऱ्यांना दिले होते, मात्र खारघरमधील तळोजा मध्यवर्ती कारागृहाच्या मागील बाजूस असलेल्या डोंगराच्या पायथ्याशी माती उत्खनन करून माती दुसरीकडे घेऊन जात आहे. त्यामुळे महसूल खात्याने याकडे लक्ष देण्याची मागणी पर्यावरणप्रेमींकडून होत आहे.

> **तळोजा परिसरात खोलगट जागेत मातीचा भरावासाठी या मातीचा उपयोग केला जात आहे. रात्रीच्या वेळी डंपर मोठ्या वाहतूक होत असल्याच्या तक्रारी आल्या आहेत. त्यामुळे घटनास्थळी पाहणी करून योग्य ती कारवाई केली जाईल.**
> **-विजय पाटील, तहसीलदार**

## जनावरांची अवैध वाहतूक करणाऱ्या गाडीला अपघात

### तीन जनावरांचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

अवैधरित्या मुक्या जनावरांची वाहतूक करणाऱ्या एका इनोव्हा गाडीला बुधवारी (दि. २७) सकाळी पनवेलजवळ अपघात झाला. या अपघातात तीन मुक्या जनावरांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.

पनवेलजवळील जेएनपीटी मार्गावरील गावदेवी ढाब्या समोरून आज सकाळी भरधाव वेगाने जाणाऱ्या इनोव्हा गाडी (एमएच ०२ सिबी ४२७९) वरील चालकाचा गाडीवरील ताबा सुटून गाडीचा अपघात होऊन या गाडीत असलेली तीन मुकी जनावरे एक गाय व दोन म्हशी यांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या अपघातानंतर गाडी चालक गाडी जागेवर सोडून पसार झाला आहे.

अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली असून अज्ञात गाडी चालका विरोधात आर्थिक फायद्याकरिता मुक्या जनावरांची वाहतूक, प्राण्यांना निर्दयीपणे वागवणे आदी गुन्हे दाखल करण्यात आले आहे.
















**पनवेल : दत्त जयंतीनिमित्त महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी शहरातील टपाल नाका, मिरची गल्ली तसेच खारघर आणि कामोठे परिसरात ठिकठिकाणी आयोजित केलेल्या जयंती उत्सवांना भेट देत मनोभावे दर्शन घेतले. या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, युवामोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, सरचिटणीस अभिषेक भोपी आदी उपस्थित होते.** (छाया : प्रफुल्ल कांबळे)

## वांगणी तर्फे वाजे ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी भाजपचे अरुण जले

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील वांगणी तर्फे वाजे ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी भाजपच्या अरुण जले यांची बिनविरोध निवड झाली आहे.

या निवडणूकीच्या वेळी भाजप तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, माजी जि. प. सदस्य अमित जाधव, दुंदरे विभागीय अध्यक्ष सुनील पाटील, वाजे सरपंच सूरेखा पवार, सदस्य संतोष शेळके, अक्षता म्हात्रे, सुवर्णा पाटील, संपदा पालव, लीलाबाई कातकरी, वाजे माजी सरपंच राजेश भोईर, माजी सरपंच अनंता पाटील, मोहो माजी सरपंच गुरुनाथ भोईर, वारदोलीचे धमाजी भोपी, मयुर घरत, गणेश पाटील, युवा कार्यकर्ता राजू घनसोलकर, विक्रांत घनसोलकर, शांताराम पाटील, विकास गाताडे, जगन गाताडे, अनिल गाताडे, नितीन जले, नितीन भोपी, प्रदीप पवार, गणपत गडकरी, ओमकार पाटील, कल्पेश पाटील, मनिष जले, धीरज जले, अजय जले, प्रकाश जले, केतन घरत आदी उपस्थित होते.







**पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांना दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. त्याबद्दल देवसागर साधक समाजाच्या वतीने शिवाजीनगर मंदिरामध्ये न्हावे, न्हावेखाडी, गव्हाण, कोपर शिवाजीनगर ग्रामस्थांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.**



**पनवेल : करंजाडे जवळील पुष्पकनगर येथे म्हात्रे बिल्डर्स ॲण्ड डेव्हपर्सचा नवीन व्यवसाय नारायण म्हात्रे, एकनाथ म्हात्रे, नवनाथ म्हात्रे यांनी सुरू केला आहे. त्यांच्या या व्यवसायाच्या नवीन कार्यालयाचे उद्घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते मंगळवारी झाले. या कार्यालयाला पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देऊन म्हात्रे बंधुंना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी करंजाडे ग्रामपंचायतीचे सरपंच मंगेश शेलार, नंदेश्वर महाराज संतोष दत्तात्रय गायकवाड, दिपाली म्हात्रे आदी उपस्थित होते.**







**पनवेल : जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेलमधील सीकेटी ज्युनियर कॉलेजचे प्राचार्य प्रशांत मोरे यांना वाढदिवसानिमित्त संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी सीकेटी महाविद्यालयाचे प्राचार्य एस. के. पाटील, प्राचार्य उपेंद्र गायकवाड, दिनेश थवई उपस्थित होते. दरम्यान, लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे स्वीय सहाय्यक अमित जाधव, शरद डोमे, संजय कोळी, राजू झांबरे, राजेश सक्ते, बाळाराम दमडे यांनीही मोरे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.**




**खारघर : पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते खारघरचा राजा मंडळाच्या वतीने प्रकाशित केलेल्या २०२४ सालच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले.**

## मध्य रेल्वेच्या सल्लागार समितीवर संजय जैन

**पनवेल : वार्ताहर**



मध्य रेल्वेचे अत्यंत महत्वाचे व मध्यवर्ती स्थानक असलेल्या खांदेश्वर रेल्वे स्थानकाच्या सल्लागार समितीवर सामाजिक कार्यकर्ते संजय जैन यांची सदस्य म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.

या निवडीचे पत्र संजय जैन यांना नुकतेच मध्य रेल्वेच्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल मुंबई येथील मंडळ कार्यालयातील वरिष्ठ व्यवस्थापक जितेंद्र यादव यांच्या कडून देण्यात आले आहे. मध्य रेल्वेच्या मुंबई विभागातील खांदेश्वर रेल्वे स्थानकाच्या सल्लागार समितीवर संजय जैन यांची ही निवड १ जानेवारी २०२४ ते ३१ डिसेंबर २०२४ या एक वर्षाच्या कालावधी साठी असणार आहे.

संजय जैन यांची निवड झाल्याबद्दल त्याचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

## संपादकीय

# भीती नको, दक्षता हवी

जगभरात पुन्हा एकदा नव्या कोविड-१९ विषाणू उपप्रकाराची चर्चा सुरू झाली आहे. भारतही याला अपवाद नाही. कोविड-१९च्या देशातील ताज्या केसेसची संख्या बुधवारी चार हजारांच्या वर पोहोचली. यात केरळमधील रुग्णसंख्या सर्वाधिक असून सुटीमुळे गोव्यात पर्यटकांची गर्दी झाल्यामुळे की काय, दिवसभरातील सर्वाधिक रुग्ण गोव्यात नोंदले गेले. या सर्व रुग्णांमध्ये कोविड-१९चा नवा उपप्रकार जेएन.१ हा विषाणू आढळला आहे.

**जगभरातील अनेक देशांमध्ये २०१९च्या डिसेंबरमध्येच कोविड-१९ या विषाणूने जनजीवन विस्कळीत करण्यास सुरुवात केली होती. यंदाच्या डिसेंबरमध्ये जेएन.१ या कोविड विषाणूची चर्चा जगभरात सुरू झाली आहे. जागतिक आरोग्य संघटनेने या विषाणूला 'व्हेरिएंट ऑफ इंटरेस्ट' असे संबोधले असून या विषाणूपासून कमी धोका दिसतो आहे असेही म्हटले आहे. मात्र वेगाने पसरणारा हा उपप्रकार एव्हाना भारताखेरीज चीन, ब्रिटन आणि अमेरिकेत आढळतो आहे. २०२१च्या डिसेंबरमध्ये ओमिक्रॉन या कोविड उपप्रकारामुळे जगभराचे धाबे दणाणले होते. २०२२च्या डिसेंबरमध्ये कुठलाही नवा उपप्रकार समोर आला नसला तरी ओमिक्रॉनच्याच उपप्रकारांचा फैलाव काहिसा वाढला होता. डिसेंबरमध्येच हे विषाणू डोके वर काढतात कारण डिसेंबरमधील थंड आणि कोरडी हवा या विषाणूंसाठी पोषक ठरते आणि डिसेंबर हा जगभरात सुटीचा काळ असल्याने फैलाव झपाट्याने होतो असा निष्कर्ष संशोधनाअंती काढण्यात आला आहे. ताज्या कोविड विषाणूमुळे कर्नाटकात तीन मृत्यूंची नोंद झाली आहे, पण तूर्तास देशातील कोविडसंबंधी मृत्यूदर अवघा १.१९ टक्के इतकाच असल्याचे सांगितले जाते. गोव्यापाठोपाठ महाराष्ट्र, कर्नाटक, केरळ, तामिळनाडू आणि तेलंगणा येथे नव्या केसेस आढळल्या आहेत. जेएन.१च्या बहुतांश केसेसमध्ये सौम्य लक्षणे आहेत. एकूण केसेसपैकी ३१२८ केरळमधील, ३४४ कर्नाटकातील, ३७ गोव्यातील तर ५० महाराष्ट्रातील आहेत. हा नवा विषाणू धोकादायक नाही असे दिसत असले तरी कुणीही बेपर्वाईने वागू नये, असे आवाहन तज्ज्ञांनी केले आहे. कर्नाटकातील वाढत्या केसेस लक्षात घेऊन तेथील सरकारने प्रतिबंधात्मक मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. सार्वजनिक ठिकाणी मास्क वापरणे, सामाजिक अंतर राखणे, बाधित व्यक्तींनी सात दिवस कुणाशी संपर्क न येऊ देणे आदींचा यात समावेश आहे. नववर्षाच्या आगमनानिमित्त आयोजित कुठल्याही सोहोळ्यावर निर्बंध लादले जाणार नाहीत हेही कर्नाटक सरकारने स्पष्ट केले आहे. वयोवृद्ध व गंभीर स्वरुपाचे आजार असणाऱ्या व्यक्तींनी अधिक काळजी घ्यायची आहे यावरच तज्ज्ञ भर देत आहेत. कोणीही भयभीत होऊ नये. सगळ्यांनी निव्वळ खबरदारी घ्यावी. सरकार परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे असे केंद्र सरकारकडून सांगण्यात आले आहे. फुफ्फुस व हृदयाशी संबंधित विकार असणाऱ्यांनी तसेच प्रतिकारशक्ती कमी असणाऱ्यांनी अधिक दक्षता बाळगावी असे तज्ज्ञ सांगत आहेत. या गटातील नागरिकांसाठी खरे तर साधा फ्लूसुद्धा चिंताजनकच मानला जातो. नव्या कोविड उपप्रकाराची पाहणी अद्याप पूर्ण झालेली नाही. हा विषाणू वेगाने पसरतो आहे, पण रुग्णालयात दाखल होण्याची गरज दिसलेली नाही. शंका वाटणाऱ्या सर्वांनी तपासणी मात्र अवश्य करावी. त्यातूनच आपल्याला हा विषाणू प्रकार कसा आहे हे कळेल. कुठल्याही प्रकारच्या संसर्गापासून आपली काळजी घेणे ही आपलीच जबाबदारी मानली पाहिजे. लसीकरण ही सरकारची जबाबदारी होती. दक्षता ही आपली जबाबदारी आहे हे लक्षात ठेवलेले बरे.**

# नगरभूमापन आणि सातबारा यंत्रणांचा पोलादपूरमध्ये घोळ

पोलादपूर तालुक्यामध्ये तसेच रायगड जिल्ह्यामध्ये नगरभूमापन विभाग आणि महसुली सातबारा उतारा दुहेरी यंत्रणांमध्ये घोळ मोठ्या प्रमाणात दिसून येत असून भविष्यात यामध्ये अधिकच वादावादी घडून येण्याची शक्यता डिजिटलायझेशनमुळे निर्माण झाली आहे. गावठाणालगतच्या जमिनींच्या बिनशेती सातबारा उताऱ्यांना गावठाणाचा दर्जा देण्याच्या अथवा मिळकतपत्र देण्याच्या भूमिकेतून सातबारा एका कुटूंबाच्या नावावर आणि मिळकतपत्र भलत्यांच्याच नावावर असे घोळ झालेले दिसून येत आहेत.

पोलादपूर शहरातील सुंदर गणपत सोनार यांच्या नावावरील १९३२पासूनच्या सातबारा उताऱ्यावरील जमिनींची वासलात वेळोवेळी पोलादपूर तालुक्यात आलेल्या अधिकाऱ्यांनीच लावलेली दिसून येत असल्याने केवळ सातबारा आणि आठ अ हाती बाळगण्याखेरिज सोनारांच्या वारसांकडे काहीच उरणार नसल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. यासोबतच पूर्वीची नगरभूमापनमधील हाताने लिहून दिलेली मिळकतपत्रे आणि आता डिजिटल मिळकतपत्रे यांच्यातील मालमत्तेच्या धारणापद्धतीचा उल्लेख बदलेला दिसून येत आहे आणि ड्रोन पध्दतीने मोजणी करण्यामुळे प्रत्यक्ष मोजमापापेक्षा अधिक जमिनीचे क्षेत्र लगतच्या मोजणी करणाऱ्यांच्या नकाशामध्ये समाविष्ट होत असल्याने हे वाद प्रथम उपअधिक्षक अधिकारी त्यानंतर जिल्हा अधिक्षक अधिकारी नगरभूमापन यांच्या न्यायालयामध्ये जात असल्याने भविष्यात मालमत्ताधारक पोलादपूरकरांना प्रचंड मनस्ताप सोसावा लागणार आहे तर मालमत्तेवर अतिक्रमण करणाऱ्यांना जमिनीची लॉटरीच लागणार आहे.

पोलादपूर तालुक्यातील नगरभुमापन विभागाने मालमत्तापत्रातील धारणाधिकार याबाबत मिळकतपत्रधारकांना कोणत्याही प्रकारचे प्रबोधन केले नसल्याने मिळकत पत्र असणे म्हणजेच मालकी असल्याची मानसिकता मिळकतपत्र धारकांमध्ये दिसून येते. यामुळे तोंडी चौकशीचा अहवाल, सातबारा उताऱ्यांचे नगरभूमापन आणि नकाशावरील मोजमाप याकडे १९८६ सालापासून दूर्लक्ष करून संबंधित कार्यालयातील अधिकाऱ्यांना खुश करून मालक बनणाऱ्यांची संख्या प्रचंड दिसून आली. धारणाधिकार म्हणजे गावठाणातील पर्डीनंबर व्यतिरिक्त मिळकती ज्या परंपरेनुसार सारामाफीस पात्र आहेत. शासनाकडून भाडेपट्ट्याने घेतलेल्या मिळकती, क-१ गावठाणातील पर्डीनगरपैकी अकृषित कारणांसाठी उपयोगात आणलेल्या मिळकती ज्या महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियमाच्या कलम १२५ अन्वये अकृषिक आकार व दंड आकारणीस पात्र आहेत. क-२ गावठाणाबाहेरील शेतीसाठी आकारणी केलेल्या परंतू अकृषिक वापरासाठी उपयोगात आणलेल्या मिळकती ज्या महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियमाच्या कलम १२५ अन्वये अकृषिक आकार दंड आणि कृती यास पात्र आहेत अशा, क-३ ज्यावर अकृषिक आकार भरला जातो अशा मिळकती, सार्वजनिक अथवा विशिष्ठ कारणांसाठी उपयोगात आणलेल्या अथवा राखून ठेवलेल्या मिळकती, जिल्हा परिषद अथवा ग्रामपंचायत यांच्या मालकीचा अथवा त्यांच्याकडे हस्तांतरीत केलेल्या मिळकती, शासनाच्या मालकीच्या मिळकती असा धारणाधिकार पोलादपूर शहरवासियांना माहिती नसल्याचे दिसून येत आहे. पर्डीनंबरपैकी क-१ व्यतिरिक्त राहिलेल्या मिळकतींचा शेतीकडे या सदरात उल्लेख होत असल्याने त्यांना धारणाधिकारी दिलेला नसल्याचेही नगरभूमापनच्या नियमांमध्ये नमूद केले आहे.

राज्य सरकारच्या महसूल आणि वनविभाग यांच्याकडील संकिर्ण आदेशाद्वारे जमीनीच्या मोजणी दरात दुप्पट वाढ झाल्याचे आदेश जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख पुणे यांच्या कार्यालयातून जारी झालेल्या परिपत्रकाद्वारे राज्यातील तालुका, जिल्हा आणि विभागीय भूमि अभिलेख कार्यालयांना कळविण्यात आले आहे आणि ही वाढ बुधवार दि.१० फेब्रुवारी २०१० रोजीपासून लागू झाली.

**खबरबात**
**शैलेश पालकर**

फक्त शेतकऱ्यांसाठी एक किंवा समान शेतकऱ्यांचे कास्तकारांचे दोन हेक्टर मर्यादेपर्यंत एक सर्व्हे नंबर,गट नंबर, पोटहिस्सा नंबर आदी मंजूर रेखांकनातील एका भूखंडासाठी साधी मोजणी करण्यासाठी एक हजार रूपये, तातडीची मोजणी दोन हजार रूपये तर अतितातडीची मोजणी तीन हजार रुपये अशी मोजणीची फी निर्धारित करण्यात आली आहे. त्याच एक स.नं.,गट नं.,पो.हि.नं., मंजूर रेखांकनातील परिच्छेद ११ मध्ये नमूद केलेल्या मर्यादेपुढील उर्वरित प्रत्येक दोन हेक्टर क्षेत्रासाठी किंवा त्याचे भागास साधी मोजणी करण्यासाठी ५०० रुपये, तातडीची मोजणी एक हजार रुपये तर अतितातडीची मोजणी दीड हजार रूपये अशी मोजणीची फी आकारली जाणार आहे. जादा मोजणी करून मागितलेली जमीन लगत नसल्यास अशा दोन्हीप्रमाणे नमूद केलेली फी आकारण्यात येणार आहे. फक्त शेतकऱ्यांसाठी मोजणी फी आकारणी करताना जिरायत अथवा बागायत अशी वर्गवारीची अट लागू करण्यात आली नाही.

कंपन्या इतर संस्था आणि शेतकऱ्यांव्यतिरिक्त इतर बाबींसाठी एक किंवा समानधारकांचे एक हेक्टर मर्यादेपर्यंत एक सर्व्हे नंबर, गट नंबर, पोटहिस्सा नंबर आदी मंजूर रेखांकनातील एका भूखंडासाठी साधी मोजणी करण्यासाठी जिरायत एक हजार रुपये तर बागायत दोन हजार रुपये, तातडीची मोजणी जिरायत दोन हजार रुपये व बागायत चार हजार रुपये, तर अतितातडीची मोजणी जिरायत तीन हजार रुपये व बागायत सहा हजार रुपये अशी मोजणीची फी निर्धारित करण्यात आली आहे. त्याच एक स.नं.,गट नं.,पो.हि.नं., मंजूर रेखांकनातील परिच्छेद २१मध्ये नमूद केलेल्या मर्यादेपुढील उर्वरित प्रत्येक एक हेक्टर क्षेत्रासाठी किंवा त्याचे भागास साधी मोजणी करण्यासाठी जिरायत ५०० रुपये व बागायत एक हजार रुपये, तातडीची मोजणी जिरायत एक हजार रूपये व बागायत दोन हजार रूपये तर अतितातडीची मोजणी जिरायत दीड हजार रुपये व बागायत तीन हजार रूपये अशी मोजणीची फी आकारली जाणार आहे. जादा मोजणी करून मागितलेली जमीन लगत नसल्यास अशा दोन्ही प्रमाणे नमूद केलेली फी आकारण्यात येणार आहे.

जिरायत अथवा बागायत क्षेत्र निश्चित करताना ७१२वरील बागायत नोंद किंवा पिक पाहणीची नोंद विचारात घेऊन आकारणी करण्यात येणार आहे. यामध्ये मिश्र बागायत अशा नोंदीसाठी पहिल्या एक हेक्टर मर्यादेपर्यंत बागायत दराने मोजणी फी आकारण्यात येणार आहे. बागायत व्यतिरिक्त इतर सर्व प्रकारच्या जमिनीस जिरायत दराने मोजणी फी आकारण्यात येणार आहे.

नगरभूमापन हद्दीतील क्षेत्रामध्ये महानगरपालिका क्षेत्रातील प्रत्येक मिळकतीस एक हजार चौरस मीटर मर्यादेपर्यंत साधी मोजणी करण्यासाठी दोन हजार, तातडीची मोजणी करण्यासाठी चार हजार तर अतितातडीची मोजणी करण्यासाठी सहा हजार मोजणी फी आकारली जाणार आहे. त्याच मिळकतीमधील उपरोक्त परिच्छेद ३१ अ मध्ये नमूद केलेल्या मर्यादेपुढील उर्वरित प्रत्येक एक हजार चौ. मी. क्षेत्रासाठी किंवा त्याच्या भागास अथवा मंजूर रेखांकनातील पुढील प्रत्येक भूखंडासाठी साधी मोजणी एक हजार रुपये, तातडीची मोजणी दोन हजार रुपये तर अतितातडीची मोजणी तीन हजार रुपये अशी मोजणी फी आकारली जाणार आहे. प्रत्येक लगत मिळकतीस मनपा हद्दीतील एक हजार चौ.मी. मर्यादेपर्यंत, नगरपालिका हद्दीतील दोन हजार चौ.मी. मर्यादेपर्यंत साधी मोजणी एक हजार रुपये, तातडीची मोजणी दोन हजार रुपये तर अतितातडीची मोजणी तीन हजार रुपये अशी मोजणी फी आकारण्यात येणार आहे. महापालिका अथवा नगरपालिका क्षेत्राव्यतिरिक्त इतर क्षेत्रातील प्रत्येक मिळकतीस साधी मोजणी एक हजार रुपये, तातडीची मोजणी दोन हजार रुपये तर अतितातडीची मोजणी तीन हजार रुपये अशी मोजणी फी आकारली जाणार आहे. यामध्ये प्रत्येक जादा मिळकतीस साधी मोजणी ५०० रुपये, तातडीची मोजणी एक हजार रुपये तर अतितातडीची मोजणी करण्यासाठी दीड हजार रुपये मोजणी फी आकारण्यात येणार आहे.

भूसंपादन मोजणी, कोर्ट वाटप अथवा कोर्ट कमिशन मोजणी प्राधान्याने करावी लागत असल्याने सर्व प्रकारांतील तातडीची मोजणी फी आकारली जाणार आहे तर हे मोजणी दर हद्द कायम, बिगरशेती, प्रतवारी अगर अभिलेख दुरूस्ती इत्यादीसाठी लागू होणार आहेत, असे आदेश जमावंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख पुणे यांच्या कार्यालयातून जारी केले आहेत. यापूर्वीही जमिनीच्या मोजणीची फी दुप्पटीने वाढविण्यात आली होती. त्यामुळे जमिनव्यवहारातील सर्वांनाच आता फीवाढीस सामोरे जावे लागणार आहे.




# यूट्युबने लाँच केले खास टुलसह नवीन फीचर





यूट्युब वापरकर्त्यांसाठी कंपनी नवीन फीचर आणि काही खास संधी घेऊन येत आहे. या नवीन फीचरच्या मदतीने क्रिएटर्स यूट्युबवर अधिक सहजपणे त्यांचा ब्रॅण्डेड कन्टेन्ट सोशल मीडियावर पोस्ट करू शकतात.

यूट्युबने युजर्स आणि क्रिएटर्ससाठी दोन खास फीचर्स लाँच केली आहे. एक तर प्रॉडकास्ट आणि दुसरे म्हणजे ब्रॅण्डेड कन्टेन्ट. आता क्रिएटर्ससाठी त्यांचे प्रॉडकास्ट त्यांच्या प्रेक्षकांपर्यंत पोहचवणे आणि त्यांच्या कन्टेन्टसाठी पैसे मिळवले सोपे होईल. यूट्युबकडून यूट्युब स्टुडिओमध्ये नवीन फीचर आणण्यात येणार आहे, ज्यामुळे क्रिएटर्सना त्यांचे पॉडकास्ट यूट्युब आणि यूट्युब म्युझिकवर सहज प्रकाशित करता येणार आहेत तसेच त्यांना यूट्युब म्युझिक मुख्यपृष्ठावरील Podcast shelvesदेखील फायदा होऊ शकतो, जे युजर्सना क्रिएटरचे पॉडकास्ट शोधण्यात आणि त्यात व्यग्र ठेवण्यास मदत करील. यूट्युब म्युझिकवरील क्रिएटर्सचे प्रॉडकास्ट आता ऑन डिमांड, ऑफलाइन आणि बॅकग्राऊंडमधील गोष्ट ऐकण्यासाठीही उपलब्ध असतील. याचा अर्थ पॉडकास्टर यूट्युब प्लेटफॉर्मवरील जाहिराती आणि सदस्यतांमधून अधिक कमाई करू शकतात.

'फॅन फंडिंग' लाइव्ह स्ट्रीमदरम्यान चॅनेल मेंबरशिप किंवा सुपर चॅटद्वारे निर्मात्यांना त्यांच्या चाहत्यांशी कनेक्ट होण्याची संधी देते. तसेच डिसेंबर २०२०मध्ये फॅन फंडिंग उत्पादनांमधून बहुतांश कमाई करणाऱ्या चॅनेल्सच्या संख्येत १० टक्क्यांहून अधिक वाढ झाल्याने भारतात फॅन फंडिंग वाढत आहे.

ब्रॅण्डेड कन्टेन्टद्वारे पैसे कमवण्याचा दुसरा मार्ग म्हणजे पेड पार्टनरशिप. म्हणजेच जेव्हा क्रिएटर कन्टेन्ट तयार करतात आणि ब्रॅण्ड व एजन्सीजसह पार्टनरशिप करतात. मग क्रिएटर्सना त्याच्या बदल्यात पैसे मिळतात, तर यूट्युबने एक ब्रॅण्डेड कन्टेन्ट प्लॅटफॉर्म फीचर लाँच केले आहे, ज्यात क्रिएटर-जाहिरातदार यांची पार्टनरशिप कंपनीच्या प्रमोशनसाठीसुद्धा फायदेशीर ठरेल. आता ब्रॅण्डेड कन्टेन्ट भारतातील क्रिएटर आणि निवडक जाहिरातदारांसाठी उपलब्ध आहे. क्रिएटर त्यांच्या खास आणि ब्रॅण्डेड कन्टेन्टसाठी परफेक्ट जाहिरातदार शोधू शकणार आहेत.

# अभ्यासू नेते स्व. अरुण जेटली



**निमित्त**

अभ्यासपूर्ण युक्तिवाद, नोटाबंदी, जीएसटीसारखे धाडसी निर्णय राबविणारे देशाचे माजी अर्थमंत्री आणि भाजपचे पहिल्या फळीतील नेते दिवंगत अरुण जेटली यांची आज जयंती. भाजपचे ज्येष्ठ नेते अरुण जेटली यांच्या राजकीय प्रवासास विद्यार्थीदशेपासूनच सुरुवात झाली होती. त्यांनी दिल्ली विद्यापीठाच्या विद्यार्थी संघटनेचे अध्यक्षपद भूषवतानाच आणीबाणीच्या काळात तुरुंगवासही भोगला होता. विद्यार्थी नेते ते केंद्रीय अर्थमंत्रिपदापर्यंतच्या प्रवासात त्यांनी मिळालेल्या प्रत्येक संधीचे सोने केले. अर्थमंत्री, संरक्षणमंत्री, कायदामंत्री म्हणून त्यांची कारकिर्द प्रचंड गाजली.

२८ डिसेंबर १९५२ रोजी जन्मलेल्या अरुण जेटली यांचे वडील महाराज किशन जेटली हे वकील होते. त्यांनी दिल्लीतच प्राथमिक आणि उच्च शिक्षण घेतले. कॉमर्स शाखेतील पदवी घेतल्यानंतर त्यांनी कायद्याची पदवी घेतली होती. कार्यकर्त्याचा पिंड असलेल्या जेटलींनी विद्यार्थीदशेतच ते अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेत सक्रिय होऊन राजकारणात भाग घेतला होता. विद्यार्थी परिषदेचे दिल्लीचे अध्यक्ष आणि पुढे राष्ट्रीय सरचिटणीस म्हणूनही काम पाहिले. ते भारतीय युवा मोर्चाचेही अध्यक्ष होते. कायद्याची पदवी घेतल्यानंतर त्यांनी काही काळ देशातील अनेक उच्च न्यायालयांत वकिली केली. १९८९मध्ये त्यांची अतिरिक्त महाधिवक्ता म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. १९९०मध्ये त्यांना दिल्ली उच्च न्यायालयाने वरिष्ठ वकिलाचा दर्जा दिला.

१९७५-७७मध्ये आणीबाणीच्या काळात अरुण जेटली यांना तुरुंगवासही भोगावा लागला. आणीबाणीत त्यांना आधी अंबाला आणि नंतर दिल्लीच्या तिहार तुरुंगात टाकण्यात आले. त्यानंतर त्यांची अभाविपच्या राष्ट्रीय सरचिटणीसपदी आणि अभाविपच्या दिल्ली प्रदेशाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. ते भाजपच्या युवा मोर्चाचे अध्यक्षही होते.

१९९१पासून अरुण जेटली भारतीय जनता पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारी समितीचे सदस्य होते. १९९९च्या लोकसभा निवडणुकीच्या काळात ते भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते बनले. यानंतर अस्तित्वात आलेल्या पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या मंत्रिमंडळात त्यांनी माहिती आणि प्रसारण खात्याचे राज्यमंत्री म्हणून कार्यभार पाहिला. वाजपेयींच्या सरकारमध्ये जेटलींकडे निर्गुंतणूक खात्याचे राज्यमंत्रीपदही देण्यात आले होते. २०००मध्ये त्यांच्याकडे विधी, न्याय मंत्रालयाचा कार्यभार होता. २००९मध्ये राज्यसभेतील विरोधी पक्षनेते म्हणून त्यांची कारकिर्द चांगलीच गाजली. २०१४मधून ते उत्तर प्रदेशातून राज्यसभेवर निवडून आले. २०१४-१६मध्ये त्यांनी माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचा कारभार पाहिला. २०१४-१७मध्ये त्यांनी संरक्षण मंत्रालयाचा अतिरिक्त कार्यभारही सांभाळला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील पहिल्या सरकारमध्ये अरुण जेटली हे अर्थमंत्री होते. तब्बेत बिघडल्याने त्यांनी दुसऱ्या टर्ममध्ये मंत्री होण्यास नकार दिला होता. याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदींना पत्र लिहून त्यांनी आपला निर्णय कळविला होता. अशा या महान नेत्याचे २४ ऑगस्ट २०१९ रोजी निधन झाले. १२ सप्टेंबर २०१९ रोजी त्यांच्या स्मरणार्थ दिल्लीच्या फिरोजशाह कोटला स्टेडियमचे अरुण जेटली स्टेडियम असे नामकरण करण्यात आले. कारण ते एकेकाळी डीडीसीएचे अध्यक्ष आणि बीसीसीआयचे उपाध्यक्षदेखील होते. २८ डिसेंबर २०२० रोजी गृहमंत्री अमित शाह यांनी अरुण जेटली स्टेडियमवर अरुण जेटली यांच्या पुतळ्याचे अनावरणही केले, तर जेटलींना २०२०मध्ये सार्वजनिक व्यवहार क्षेत्रात मरणोत्तर भारताचा दुसरा सर्वोच्च नागरी पुरस्कार पद्मविभूषण प्रदान करण्यात आला.

**(साभार : इंटरनेट)**

**क्लिक...क्लिक...!**



**श्रीवर्धन : सूर्योदयावेळी रवी किरणांनी आसमंतात निर्माण केलेले वातावरण टिपले आहे अमेय नाझरे यांनी.**

## आरोग्य प्रहर

# आरोग्यदायी भोपळ्याचे 'हे' आहेत फायदे



आहारशास्त्राच्या बाबतीत सांगायचं झालं तर सगळ्याच पोषकतत्वांनी भरपूर असणारा आणि दोन्ही प्रकारचे तंतूमय पदार्थ असणारा भोपळा हा बहुगुणी म्हणून ओळखला जातो. केवळ भोपळ्याचा आतील गर नव्हे तर त्याच्या बिया, त्याचे आवरण यांचादेखील शरीराला खूप उपयोग होतो, भोपळ्याचे सगळेच भाग वेगवेगळ्या पदार्थांवर प्रक्रिया तयार करण्यासाठीदेखील वापरले जातात.

भोपळ्यात असणाऱ्या फायटोन्यूट्रिएंट्स वातावरणातील बदलानुसार शरीराचे संरक्षक कवच परिपूर्ण करतात. भोपळ्यात असणारे करक्युमिन, सॅपोनीन, फेनॉल्स, ग्लुकोसाइड्स, तार्किक, फ्लॅव्होनॉइड्स, लिग्नन यासारखे पोषणमूल्ये शरीराला अत्यंत उपयुक्त ठरतात. अल्झायमर किंवा कोणत्याही मेंदूतील वाहिन्यांची निगडित आजारांमध्ये प्रत्येक जेवणात भोपळ्याचा समावेश अत्यंत गुणकारी आहे. मानसिक आरोग्य राखण्यासाठी देखील भोपळ्याचे सेवन गुणकारी आहे.

कॅरोटिनॉइड, ल्युटीन, झियाझानथिन, जीवनसत्त्व इ आणि जीवनसत्त्व क यांच्या मुबलक प्रमाणामुळे भोपळ्यातून पुरेशा प्रमाणात अँटिऑक्सिडंट्सचा शरीराला पुरवठा होऊ शकतो. त्वचेच्या आजारांमध्ये भोपळ्यातील कॅरोटिनॉइड्स आणि अ जीवनसत्त्व उत्तम परिणाम देते. भोपळ्यांच्या बियांचे सेवन शरीरातील साखरेचे प्रमाण उत्तम राखते आणि मधुमेहापासून रक्षण करते. ज्या महिलांना मासिक पाळीचे असंतुलन किंवा संप्रेरकांचे असंतुलन आहे त्यांच्यासाठीदेखील भोपळ्याच्या बियांचे नियमित सेवन मासिक पाळी नियमित करण्यासाठी मदत करते. भोपळ्याच्या बियांमध्ये मॅग्नेशिअम, कॅल्शिअम, पोटॅशिअमचे मुबलक प्रमाण आढळते. त्यामुळे एकाचवेळी उत्तम ऊर्जा आणि मानसिक आरोग्यदेखील उत्तम राहते.

ज्यांना फॅटी लिव्हर आहे त्यांच्यासाठी भोपळ्याच्या रसाचे नियमित सेवन केल्याने उत्तम परिणाम दिसून येतात. वाढलेले फॅट्स आणि कोलेस्ट्रॉल या दोन्हीसाठी परिणामकारक असणारा भोपळा आहार शास्त्रज्ञांचा लाडका आहे. अनेकदा सलाडमध्ये किंवा घरगुती सूप किंवा सांबर, डाळ तयार करताना भोपळा समाविष्ट करण्यासाठी आहारतज्ज्ञ आग्रही असतात.

# रायगडमधील पोलीस ठाण्याची स्मार्ट वाटचाल

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

पोलीस ठाण्यातील वातावरण पाहिले की, भल्या भल्यांना घाम फुटतो. त्यामुळे कोट आणि पोलीस ठाण्याची पायरी चढूच नये असे बोलले जाते. पोलिसांची ही प्रतिमा बदलण्याचे प्रयत्न गृह विभागाकडून केला जात आहेत.

पोलीस ठाण्यांमध्ये प्रसन्न वातावरणासह पेपरलेस व ऑनलाईन कामकाजावर भर दिला जाणार आहे. नागरिकांसाठी आवश्यक त्या सर्व बाबी ऑनलाईन उपलब्ध झाल्या असल्या तरी सरकारी विभाग व सर्वसामान्यांमधील विसंवाद दूर करण्याचा प्रयत्न सुरू आहे. याच पार्श्वभूमीवर राज्य सरकारने स्मार्ट पोलीस ठाण्याची संकल्पना पुढे आणली असून जिल्ह्यातील २८ पोलीस ठाणे येत्या काही दिवसांत स्मार्ट होणार असल्याची माहिती पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिली.



(संग्रहित छायाचित्र)

रायगड पोलीस अधिक्षकांच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या २८ पैकी २४ स्मार्ट पोलीस ठाण्यांचे काम पूर्ण होत आले आहेत. उर्वरित चार पोलीस ठाण्यांचेही काम पुढील काही दिवसांत पूर्ण होईल, असे घार्गे यांनी सांगितले. पोलीस ठाणी स्मार्ट होताना बाह्यरंग बदलण्यासोबतच कार्यपद्धतीतही बदल करण्याचा यावा, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने पोलीस दलाला इंटरनेटच्या माध्यमातून ऑनलाईन तसेच तांत्रिकदृष्ट्या सक्षम करण्याचा प्रयत्न सुरू आहे. त्याअनुषंगाने गृह विभागाने 'स्मार्ट पोलीस ठाण्याची' संकल्पना पुढे आणली आहे. तक्रारदाराला पोलीस ठाण्याच्या पायऱ्या झिजवाव्या लागणार नाहीत, हा त्यामागील उद्देश आहे.

### ऑनलाईन कामकाजावर भर

सर्वसामान्य नागरिक पोलीस ठाण्यात जाण्यास तयार नसला तरी नोकरी, पासपोर्टसाठी आवश्यक असलेली चारित्र्य पडताळणी, शस्त्र परवाने, सांस्कृतिक कार्यक्रमांची परवानगी, धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी साऊंड सिस्टिमची परवानगी, उपोषण, मोर्चे, सार्वजनिक सभा यांच्यासाठी पोलीस ठाण्यात पत्रव्यवहार करावाच लागतो. यासाठी फेऱ्या मारूनही कामे वेळेवर होत नाहीत. वास्तविक हे काम ऑनलाईन शक्य आहे. यातील काही परवानग्या ऑनलाईन देण्याचे काम यापूर्वीच सुरू झाले आहे; परंतु यास गती आलेली नाही.

### स्मार्ट पोलीस ठाणे म्हणजे काय?

- स्मार्ट पोलीस ठाणे अंतर्गत नागरिकांना ठरवून दिलेल्या सेवा, २४ तास पुरवण्यासाठी कटिबद्ध असणे,
- गुणवत्ता व्यवस्थापन प्रणालीद्वारे सर्वोत्तम सेवा, नागरिकांच्या गरजेनुसार यशस्वीरीत्या राबविणे
- कायदा व सुव्यवस्था, गुन्हे नियंत्रण, कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता व तंत्रज्ञानाचा पुरेपुर वापर प्रस्थापित करणे
- कार्यप्रणालीत वेळोवेळी सुधारणा करणे.
- पोलीस ठाण्यांचा परिसर स्वच्छ असणे, इमारत सुसज्ज असणे.
- पोलीस ठाणेमधील सर्व अभिलेख अद्ययावत असणे.
- पोलीस ठाण्यात येणाऱ्या नागरिकांना तत्काळ मदत उपलब्ध करून करणे.

**पोलिसांच्या कारभारात गतिमानता आणताना कामकाजात पारदर्शकता, कार्यालयात प्रसन्न वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न आहे. डिजिटलायझेशनमुळे पोलीस ठाण्यात वायफाय सर्व ठिकाणी राहील. सध्या ऑनलाईन तक्रार दाखल करण्याचे काम सुरू झाले असले, तरी इतरही अनेक समस्या इंटरनेटच्या स्मार्ट वापराने कमी करता येऊ शकतात.**

**–सोमनाथ घार्गे, पोलीस अधीक्षक, रायगड**

### इतर कामांसाठी मिळणार वेळ

पोलिसांना कायदा सुव्यवस्था राखताना परवानग्यांशिवाय इतर अनेक कामे करावी लागतात. यासाठी करावा लागणारा पत्रव्यवहार ऑनलाईन पद्धतीने गतिमान झाल्यास कामकाजाच्या वेळेची बचत होईल, शिवाय इतर कामांनाही वेळ देता येईल.

### कर्मचाऱ्यांसाठीच्या सुविधा

कर्मचारी व अधिकारी यांचे स्वास्थ्य अबाधित राखण्याकरिता सुसज्ज खेळाचे मैदान असणे, पोलीस कर्मचारी तसेच नागरिकांसाठी पार्किंग व्यवस्था असणे, महिलांसाठी स्वतंत्र दालन असणे, नागरिकांच्या सोयीकरिता पोलीस ठाण्यातील कामकाजाची माहिती दर्शविणारे फलक असणे.

## रायगड किल्ला प्रदक्षिणेत पोलीस विभाग, पोस्ट ऑफिसचा सहभाग

**रायगड : प्रतिनिधी**

यंग फाउंडेशन महाड यांच्यातर्फे दरवर्षी रायगड किल्ला प्रदक्षिणा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. त्यानुसार यावर्षीच्या रायगड किल्ला प्रदक्षिणेत जिल्हा पोलीस अधीक्षक, रायगड सोमनाथ घार्गे व डाक अधीक्षक सुनील थळकर सहभागी झाले हे सर्व स्पर्धकांसाठी विशेष होते.



वर्षातून एकवेळच यंग फाउंडेशन महाड यांच्यातर्फे आयोजित केली जाणारी रायगड किल्ल्याची प्रदक्षिणा हा अनुभव नियमित ट्रेकरच्या पेक्षाही अनुभव नसणाऱ्या नवागतानसाठी नक्कीच साहसपूर्ण, चालणाऱ्याचा कस काढणारा, दमछाक करणारा आहे. या प्रदक्षिणेतील शेवटचे दोन टप्पे तर निसरड्यावाटेमुळे नक्कीच सावधानतेचा वेगळा अनुभव देणारा होता. यात स्थानिक बाहेरून आलेल्या पर्यटकांचे लक्ष वेधले ते रायगड पोलिस विभाग आणि रायगड डाक विभाग यांनी दोन्ही टीमने.

रायगड डाक अधीक्षक सुनील थळकर यांनी सहभागी होत प्रोस्तहीत केल्याने त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत रायगड डाक विभागातर्फे २४ शिलेदारानी या प्रदक्षिणेत उतरत पोस्टमास्टर गजेंद्र भुसाणे, चंदन कुमार, प्रवीण साळुंके, समीर म्हात्रे, प्रसाद फडके, मनोज अंबुरे, नागेश साखरकर, अनिल नाईक, संतोष चिपळूणकर, मयूर भोईलकर, विशाल पाटील, परेश राऊत, नितीन पाडोळे, विनय पाटील, क्षितिज पाटील, महावीर नेटके, नीलेश राणे, उमेश राणे, सुबोध राणे यांनी ही परिक्रमा पूर्ण केली.


**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website https://srmetender.mahatransco.in/ for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost in Lakhs |
|---|---|---|
| Tend-44/23-24 7000029017 | Work of erection of gantry structure for 220/22kV power Transformer 1 & 2 and re-orientation of 220kV Main bus section I & II at 220/100kV22kV Kandalgaon S/stn under EHV (O&M) Dn. Mahad under EHV (O&M) Circle, Panvel. | Rs.47.36 Lakhs |
| Tend-47/23-24 7000029435 | Work of replacement of old RCC type of requirement structure by lattice type equipment structure at 100kV Roha and 220kV Kandalgaon S/Dn. under EHV (O&M) Circle, Panvel. | Rs. 58.99 Lakhs |
| Tend-48/23-24 7000029423 | Work of renovation of earthing at 220kV Kandalgaon s/stn. under EHV (O&M) Division Mahad under EHV (O&M) Circle, Panvel. | Rs. 49.64 Lakhs |

**EMD 1% of Estimated Cost. Submission of Bids from** 27.12.2023 to 04.01.2024 up to 11:00 hrs, **Opening Date:** 04.01.2024 @ 11:30 Hrs. **Tender Fee:** Rs. 500/-+ GST. For further details visit our website https://srmetender.mahatransco.in/ **Contact Person:** The Executive Engineer (Adm) Tel No. 022-27459624, Mob. No. 9769006131 E-mail ID se7200@mahatransco.in

**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV (O&M) CIRCLE, PANVEL**


## कृषी दिनदर्शिकेचे प्रकाशन



**धाटाव : प्रतिनिधी**

सलाम रायगड संपादित बळीराजा फाउंडेशनच्या कृषी दिनदर्शिका २०२४चे प्रकाशन व प्रगतशील शेतकऱ्यांचा बळीराजा सन्मान कार्यक्रम महादेव मंदिर तळाघर येथे नुकतेच झाला.

या वेळी प्रांताधिकारी ज्ञानेश्वर खुटवड, कोलाड पाटबंधारेचे उपकार्यकारी अभियंता अतुल आगरवणे, पोलीस निरीक्षक प्रमोद बाबर, उपविभागीय अभियंता एस एस महामुनी, कृषी अधिकारी सुतार, व्हीआरटीचे सुशील रुळेकर, शेतकरी प्रतिष्ठानचे अध्यक्ष गणेश भगत, बळीराजा फांऊडेशनचे अध्यक्ष विठ्ठल मोरे, संस्थापक राजेंद्र जाधव, उपाध्यक्ष तुकाराम भगत, माजी सरपंच सतिश भगत, अनिल भगत, संदेश मोरे, कृष्णा बामणे, व मान्यवर उपस्थित होते.

कालव्याच्या पाण्यासाठी अविरत लढा देत शेतकऱ्यांच्या हितासाठी चळवळ उभी करण्याचा संकल्प केलेल्या बळीराजा फाउंडेशनच्या प्रथम कृषी दिनदर्शिकेचे शानदार प्रकाशन प्रांताधिकारी ज्ञानेश्वर खुटवड व मान्यवरांच्या हस्ते झाले. प्रत्येक पानावर कृषी विषयक माहिती, समर्पक सनावली, तितकेच आकर्षक रंगीत कॅलेंडर बळीराजाला भेट देण्यात आले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष विठ्ठल मोरे यांच्या नेतृत्वाखाली उपाध्यक्ष तुकाराम भगत, दीपक भगत, रूपेश साळवी, कृष्णा बामणे, संदेश मोरे, राकेश बामुगडे, नितेश बामुगडे, शिक्षक वृंद, शेतकरी यांनी विशेष परिश्रम घेतले.

## स्त्रीभ्रुण हत्या रोखणे जनजागृती अभियान

**रायगड : प्रतिनिधी**

रायगड जिल्हयात स्त्रीभ्रुण हत्या रोखणे जनजागृती अभियान सुरू करण्यात आले असून बेकायदेशीर गर्भलिंग निदान व गर्भपात होत असल्यास नागरिकांना तक्रार देण्याकरिता १८०० २३३ ४४७५ हा हेल्पलाईन क्रमांक सुरू करण्यात आली असल्याची माहिती जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अंबादास देवमाने यांनी दिली आहे.

गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध) अधिनियम १९९४ सुधारित २००३ या कायद्यातील कोणत्याहीत तरतूदींचे अथवा नियमांचे उल्लघन झाल्याचे आढळून आल्यास जिल्हा शल्यचिकित्सक रायगड–अलिबाग यांच्याकडे प्रत्यक्ष किंवा अर्जाद्वारे कोणीही तक्रार नोंदणी करू शकतात माहिती देणाऱ्या व्यक्तीस बातमीची खातरजमा होवून दोषी व्यक्तीवर फौजदारी गुन्हा दाखल झाल्यानंतर शासनाच्या खबऱ्या या बक्षीस योजनेंतर्गत एक लाख रुपये इतके बक्षीस देण्यात येईल. माहिती देणाऱ्या व्यक्तीचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल.

तेव्हा कोणीही गर्भलिंग निदान व गर्भपात करू नये तसे केल्याचे आढळल्यास, पीसीपीएनडीटी व गर्भपात कायद्यातील तरतुदीनुसार उचित कारवाई करण्यात येईल.


### जाहीर नोटीस

तमाम लोकांस हया जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते आहे की, आमचे अशिल हे सिडको लि. यांच्या १२.५ टक्के योजनेप्रमाणे वितरीत करण्यात आलेले खालील वर्णनाचे भूखंड लिजधारक **(१) श्री. विरेश अनिलकांत पारेख, (२) श्री. हेमंत तुलसीदास मेहता, (३) श्रीमती भद्रशिला रोहित झवेरी** यांच्याकडून मोबदल्यापोटी त्रिपक्षीय कराराने हस्तांतरीत करुन घेण्याच्या इरादयात आहेत. सदर भूखंडांचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**भूखंडांचे वर्णन**
**मौजे–खारघर, ता. पनवेल, जि. रायगड**

| भूखंड नं. | सेक्टर नं. | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|
| २२१ | १९ | २९९.९४ चौ.मी. |
| २२२ | १९ | ५४९.९७ चौ.मी. |

तरी सदर भूखंडांवर वा कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरुपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे मालकी व अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबंधितांनी हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करुन कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर भूखंडाचे हस्तांतरणाचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

पनवेल.
दिनांक : २७/१२/२०२३..

**सही/–**
**(ॲड. संदिप बटवाल)**
**वकिल, हायकोर्ट मुंबई**

पत्ता : सदनिका नं. १०३, आशादिप अपार्टमेंट, अनिल झेरॉक्सच्या बाजुला, वासुदेव बळवंत फडके नाटयगृहाजवळ, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६. Email: cssandipbatwal@gmail.com

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे वारदोली, तहसील–पनवेल, जिल्हा–रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार श्रीमती देवकी उर्फ अनुसया सखाराम पाटील, राहणार : भिंगार, पो. अजिवली, ता. पनवेल, जिल्हा रायगड, यांचेकडून आमचे अशिलानी योग्य त्या परवानग्या घेवुन कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे.

**शेतजमीनीचे वर्णन**

मौजे वारदोली, तहसील पनवेल जिल्हा रायगड येथील जिल्हा परीषद रायगड, पंचायत समिती पनवेल, मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील.

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र लावणी लायक हे.आर.प्रती | क्षेत्र पोटखराबा हे.आर.प्रती | क्षेत्र एकुण क्षेत्र हे.आर.प्रती | आकार रू.पै |
|---|---|---|---|---|---|
| १२४/४/ब | २ | ०–४०–५० | ०–००–०० | ०–४०–५० | ७.८१ |

वरील शेतजमीन मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन १५ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २८/१२/२०२३

**सही/–**
**ॲड. स्वप्निल व्यं. जाधव**
बी.ए.,एल.एल.बी.
(खरेदीदाराचे वकील)

कार्यालयीन पत्ता : बी. १०२, पहिला मजला, श्री दत्तराज सोसायटी, जुने तहसिलदार ऑफिस समोर ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६. मो.८८८८२७१७५९

### परिशिष्ट क्र. १६

(उपविधी क्र. ३५ अन्वये )

**मयत सदस्याचे संस्थेच्या भांडवलात/मालमत्तेत असलेले हितसंबंध व भाग हस्तांतरित करण्याबाबत हक्क मागण्या किंवा हरकती मागविण्यासाठी द्यावयाच्या नोटिशीचा नमुना (मोठ्या प्रमाणामध्ये प्रसारित होणाऱ्या दोन स्थानिक वर्तमान पत्रांमध्ये प्रसिद्धी देण्यात यावी.)**

**नोटीस**

सरकारी नोकर... सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, पत्ता नवीन पनवेल, या संस्थेचे सदस्य असलेल्या वा संस्थेच्या इमारतीत/भूखंडावर / गाळा/ बंगला क्र. ...........धारण करणाऱ्या श्री. सुरेश केशव प्रधान यांचे तारीख १४/०१/२००१ रोजी निधन झाले. त्यांनी नामनिर्देशन केलेले नाही. संस्था, या नोटिशीद्वारे संस्थेच्या भांडवलात/मालमत्तेत असलेले मयत सदस्याचे भाग व हितसंबंध हस्तांतरित करण्यासंबंधी मयत सदस्याचे वारसदार किंवा अन्य मागणीदार/हरकतदार यांच्याकडून हक्क मागण्या/हरकती मागवण्यात येत आहेत. ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून १५ दिवसात त्यांनी आपल्या मागण्यांच्या वा हरकतींच्या पुष्टयर्थ आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती व अन्य पुरावे सादर करावेत. जर वर नमूद केलेल्या मुदतीत, कोणाही व्यक्तीकडून हक्क मागण्या किंवा हरकती सादर झाल्या नाहीत तर, मयत सदस्याचे संस्थेच्या भांडवलातील/मालमत्तेतील भाग व हितसंबंध यांच्या हस्तांतरणाबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्याची संस्थेला मोकळीक राहील. जर अशा कोणत्याही हक्कमागण्या/हरकती आल्या तर, त्याबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्यात येईल. नोंदी व उपविधींची एक प्रत मागणीदारांस/हरकतदारांस पहाण्यासाठी संस्थेच्या कार्यालयात सचिव यांचेकडे दुपारी १२:०० ते दुपारी ४.०० पर्यंत, नोटिस दिल्याच्या तारखेपासून नोटिशीची मुदत संपण्याच्या तारखेपर्यंत उपलब्ध राहील.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २७/१२/२०२३

**सही/–**
**सचिव**
**सरकारी नोकर सहकारी गृह निर्माण संस्था मर्या.**
**सेक्टर २, नवीन पनवेल**

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस हया जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते आहे की, **१) कै. कमलाकर बाळाराम पाटील मयतचे वारस १/१) श्रीमती भाग्यलता कमलाकर पाटील, १/२) श्री. महेश कमलाकर पाटील, १/३) श्री. रितेश कमलाकर पाटील, १/४) श्रीमती स्मिता नरेंद्र कडू, १/५) श्रीमती अनिता सुरज पाटील, २) कै. सखुबाई पुरुषोत्तम घरत मयतचे वारस २/१) श्री. दिनकर पुरुषोत्तम घरत, ३) श्रीमती सुमन गंगाराम कडू, ४) कै. तुळसाबाई उर्फ गंगाबाई गंगाधर उर्फ गंगाराम ठाकूर उर्फ कडू मयतचे वारस ४/१) श्री. दिगंबर गंगाराम कडू** यांच्या सामाईक मालकीच्या शेतजमीन मिळकती शासनाने नविन मुंबई प्रकल्पाकरीता संपादीत केलेल्या असून सदर संपादीत मिळकतींपोटी १२.५ टक्के योजनेप्रमाणे **श्रीमती भाग्यलता कमलाकर पाटील वगैरे** यांना खालील वर्णनाचा भूखंड दि. २४/१/२००८ रोजीच्या अंतरिम इदारापत्राव्दारे वितरीत करण्याचे इरादीत करण्यात आलेले आहे.

**मौजे – द्रोणागिरी, ता. उरण, जि. रायगड**

| सिडको फाईल नं. | भूखंड नं. | सेक्टर नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| Dronagiri-VI-577 | ६९ | २७ | ३५० चौ.मी. |

वर नमूद भुखंड **श्रीमती भाग्यलता कमलाकर पाटील वगैरे** या लिज हक्कदारांकडून विकसनाकरीता त्रिपक्षीय कराराने हस्तांतरीत करुन घेण्याच्या इरादयात आहेत. तरी सदर भूखंडावर वा कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरुपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे मालकी व अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबंधितांनी हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करुन कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर भूखंडाचे हस्तांतरणाचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

पनवेल.
दिनांक : २७/१२/२०२३.

**सही/–**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**

कार्यालय : २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाटयगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६. मो. ९९३०३६९८६१.

### महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक १०१/२०२३-२०२४ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | रोहा औद्योगिक क्षेत्र... रोहा-कोलाड रस्त्यावरील हायमास्टसह पथदिवे बदलणे. | ₹ ३,०९,०३,१६६.०० |
| २. | महाड औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती.. महाड निवासी सांडपाणी निःसारण योजनेच्या पंपिंग स्टेशनची दुरुस्ती करणे, अंतर्गत विद्युतीकरण व परिसरात प्रकाश योजना करणे. | ₹ १५,०३,४२०.०० |
| ३. | पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती.. पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी संकलन व निःसारण वाहिन्यांची देखभाल व दुरूस्ती करणे. | ₹ ४०,६४,६१३.०० |
| ४. | पाताळगंगा पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती.. पाताळगंगा येथील अशुद्ध उदंचन केंद्र, जुने व नवीन जलशुद्धीकरण केंद्राच्या परिसरात सीसीटिव्हीचा पुरवठा करून बसविणे व कार्यान्वित करणे. | ₹ ३४,७५,४५०.०० |
| ५. | महाड व अतिरिक्त महाड औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजना, सांडपाणी निःसारण योजना, निवासी व अनिवासी इमारतींची देखभाल व दुरुस्ती... महाड व अतिरिक्त महाड औद्योगिक क्षेत्रातील विविध ठिकाणच्या विद्युत उपकरणांची नियमित देखभाल आणि आपत्कालीन बिघाडाची कामे करण्याकरीता वार्षिक तत्वावर देखभाल व दुरूस्ती करणे. | ₹ १५,७२,८४७.०० |

उपरोक्त अ.क्र. १ वरील कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक २८/१२/२०२३ ते दिनांक ११/०१/२०२४ पर्यंत व अ.क्र. २ ते ५ वरील कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक २८/१२/२०२३ ते दिनांक ०४/०१/२०२४ महामंडळाच्या http://www.midcindia.org या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी उपरोक्त अ.क्र. १ वरील कामाबाबत दिनांक ०१/०१/२०२४ पूर्वी व अ.क्र. २ ते ५ वरील कामांबाबत दिनांक २९/१२/२०२३ पूर्वी त्यांचे प्रश्न महामंडळाच्या संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा अ.क्र. १ वरील कामाबाबत दिनांक ०४/०१/२०२४ पासून व अ.क्र. २ ते ५ वरील कामांबाबत ०२/०१/२०२४ पासून महामंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

# गावठी अंड्यांचे उत्पादन घटले

## उरण परिसरात मागणीप्रमाणे पुरवठा कमी

**उरण : रामप्रहर वृत्त**

समुद्रकिनारी वसलेल्या तसेच नैसर्गिक देणगी लाभलेल्या उरण परिसरात पारा घसरलेला आहे. त्यामुळे पौष्टिक तसेच बॉयलर पेक्षा पचायला हलके आणि कित्येक पटीने चविष्ट अशा गावठी अंड्यांना उरण परिसरात मोठी मागणी आहे, पण ग्रामीण भागात कुक्कुटपालन कमी होत असल्याने त्याचा परिणाम अंड्यांचा किमतीसह उत्पादनावर झाला आहे.

उरण परिसरात ग्रामीण भागातील डोंगर रांगांमुळे कडाक्याची थंडी पडत आहे. या काळात शरीराला पौष्टिक अशा पदार्थांचे सेवन करण्याकडे अनेकांचा कल असतो. त्यामुळे या काळात गावठी कोंबड्यांच्या अंड्याला अधिक मागणी असते, पण उरण परिसरातील कुक्कुटपालन ग्रामीण भागांत पूर्वीच्या तुलनेत घटले आहे. त्यामुळे तुटवडा भासत असल्याने अंड्यांच्या किमती वाढल्या आहेत. सध्या गावठी अंड्यांचा भाव एक डझनला १५० रुपये इतका आहे. त्यामुळे चांगली मागणी असल्याने





ज्या घरात कुक्कुटपालन होते, अशा घरात दुकानदार चकरा मारत आहेत. विशेष म्हणजे, पूर्वी ग्रामीण भागात तसेच आदिवासी वाड्या-वस्त्यांवर मोठ्या प्रमाणात गावठी कोंबड्या पाळल्या जात होत्या. त्यामुळे उरण परिसरातील नागरिकांना घरच्या घरी गावठी अंड्यांचा आस्वाद घेता येत होता. कालांतराने जुनी घरे पाडून नवीन घरे बांधण्यात आली. त्यामुळे कोंबड्या पाळणे दुरापास्त झाले असल्याने गावठी कोंबड्यांची संख्या कमी झाली आहे.

गावठी आणि पांढऱ्या अंड्यांमध्ये पोषणद्रव्यांच्या बाबतीत १० ते १५ टक्क्यांचा फरक असतो. तसेच ते अधिक पोषक असतात. सध्या बॉयलर कोंबड्यांची अंडी बाजारात विक्रीसाठी असली तरी गावठी कोंबडीच्या अंड्यांची मागणी अधिक आहे. त्यामुळे मिळेल त्या भावाने ग्रामीण भागात तसेच आदिवासी वाड्यांवर जाऊन खरेदी केली जात आहे.

**ग्रामीण भागात हल्ली गावठी कोंबड्यांचे पालन कमी झाले आहे. त्यामुळे उत्पादन कमी झाले आहे. थंडी सुरू होण्यापूर्वी १५ रुपयाला एक अंड विकत होतो. मात्र, थंडीत मागणी जास्त असल्याने आता २० रुपयाला एक असे विकत आहोत.**

**-शांताराम पाटील, कुक्कुटपालक**

### वाटेल ती किंमत मोजण्याची तयारी

**वातावरणात गारठा वाढल्याने गावठी अंड्यांना चांगलीच मागणी आहे. त्यामुळे १८ ते २२ रुपयाला एक अंडे मिळत आहे. गावठी अंड्यांची पैदास नैसर्गिकरित्या होते. यामुळे या काळात त्याचे सेवन अधिक पोषक ठरते. तसेच कोणत्याही प्रकारचे केमिकल्सचा वापर होत नसल्याने शरीराला आवश्यक घटकांचा पुरवठा योग्य प्रमाणात होतो.**

### गावठी अंडी खाल्ल्याचे फायदे

- **बलकापासून व्हिटॅमिन्स, क्षार, लोह मिळते.**
- **कोलीन हा घटक बौद्धिक विकासात उपयुक्त ठरतो.**
- **डोळे निरोगी राखण्याबरोबरच स्नायूंची झीज रोखण्यासाठीही उपयुक्त असतात.**
- **शरिराला ऊर्जा, प्रथिने, काबरेहायड्रेट मिळतात.**

## प्रभू रामचंद्र मंदिराच्या अक्षत कलशाचे नेरूळमध्ये स्वागत

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

अयोध्या येथील प्रभू रामचंद्र मंदिराच्या पवित्र अक्षत कलशचे नेरूळ येथे मोठ्या उत्साहाने आगमन झाले. नेरूळ येथील विविध ठिकाणी जय श्रीराम नामाच्या घोषणा देत, शंख नाद करत, पवित्र मंत्रोच्चारांनी अक्षत कलशाचे स्वागत करण्यात आले.

या वेळी माजी महापौर जयवंत सुतार, माजी सभागृह नेते रवींद्र इथापे, माजी नगरसेवक सुरेश शेट्टी, भाजप महिला जिल्हाध्यक्ष माधुरी सुतार, माजी नगरसेविका शिल्पा कांबळी, भाजप नेरूळ मंडल अध्यक्ष कुणाल महाडिक, जयेंद्र सुतार, संघाचे राजीव दुबे, अनुप शर्मा, आर.बी.सिंग, नंदरुप चौधरी, विवेक आंबोरकर, निरज चौधरी, सुनिल पाठक, एम.आर.नायर हे आरएसएसचे पदाधिकारी तसेच नेरूळमधील शेकडो नागरिक उपस्थित होते.

अयोध्या येथील प्रभू श्रीरामाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा २२ जानेवारी २०२४ रोजी होत आहे. त्यानिमित्ताने संपूर्ण देशात श्रीराम पूजा मंगल अक्षत: कलश दर्शनासाठी आणला जात आहे. मंगल अक्षता कलशातील अक्षतांचे वाटप १ ते १५ जानेवारी दरम्यान प्रत्येक नगर मध्ये करण्यात येणार आहे.

संपूर्ण नेरुळ मध्ये काढण्यात आलेल्या मिरवणुकीला श्री प्रभू रामचंद्र यांची भव्य प्रतिमा असलेला रथ, ढोल ताशांचा गजर, शंखांचे वादन..'जय श्रीराम'चा जयघोष अशा आनंद आणि उत्साहपूर्ण राममय वातावरणात अयोध्येतील रामलल्लांची मूर्ती असलेल्या मंदिराच्या गर्भगृहात पूजन करून आलेल्या अक्षतांचे पूजन करीत करण्यात आले.



## बंद कंपनीला लागलेल्या आगीवर नियंत्रण

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

दिघा एमआयडीसीमधील महाराष्ट्र फ्लोअर मिल कंपनीला या लागली आग लागली होती. आगीत कंपनी पूर्ण जळून गेली आहे. आज दुपारी दिघा एमआयडीसीतील महाराष्ट्र फ्लोअर मिल या बंद असलेल्या कंपनीत आग लागली.

कंपनी अनेक वर्षांपासून बंद असल्याने सुदैवाने कुठलीही जीवितहानी नाही.आगीत चार मजली कंपनी पूर्णतः जळून खाक झाली. आगीचे वृत्त कळताच रबाळे एमआयडीसी ऐरोली येथिल अग्निशमन बंब घटनास्थळी पोहचले. तीन तासांच्या प्रयत्नांनी अग्निशमन दलाने आगीवर मिळवले नियंत्रण मिळवले.



## ब्लँकेटचे वाटप



**नवी मुंबई :** नवी मुंबईतील दुर्गा फाऊंडेशनच्या वतीने पनवेल व कोपरखैरणेतील जनाधर्म आधारगृह व स्वीट होम वृद्धाश्रमात ब्लँकेट वाटप करण्यात आले.

वृद्धाश्रमात ज्येष्ठांना सोयी सुविधा मिळत असल्या तरी, त्यांना मदतीचा हात म्हणून दुर्गा फाऊंडेशनतर्फे ब्लँकेट वाटण्यात आले. कडाक्याच्या थंडीत ब्लँकेटची गरज असल्याचे ज्येष्ठांनी सांगत ज्येष्ठांनी ब्लँकेटची दिल्याबद्दल आभार मानले. या वेळी दुर्गा फाऊंडेशन संस्थापिका शोभा भोईर, सचिव ध्रुव भोईर, खारघर अध्यक्षा रसिका म्हात्रे, पुर्वा तांडेल आदी उपस्थित होते.

## आनंदोत्सवाच्या स्पर्धांमध्ये 'रोटरी'च्या स्कूलचे सुयश

**पनवेल : वार्ताहर**

दातार ग्रुपच्या आनंदोत्सव १३ या क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेत रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रीयल टाऊन चॅरिटेबल ट्रस्ट संचालित रोटरी कर्णबधीर मुलांच्या निवासी शाळेने यशस्वी सहभाग घेतला.

या क्रीडा स्पर्धेत एकूण २६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्यापैकी प्रथम क्रमांकाची एकूण आठ बक्षिसे, द्वितीय क्रमांकाची पाच बक्षिसे तर तृतीय क्रमांकाची पाच बक्षिसे अशी एकूण १८ बक्षिसे मिळवून घवघवीत यश प्राप्त केले. सांस्कृतिक स्पर्धेमध्ये सहभागी १० विद्यार्थ्यांनी 'शिव तांडव' नृत्य सादर करुन प्रत्येकाचे मन रोमांचित करुन जिंकले. या नृत्याने ११,००० रुपयाचे रोख पारितोषिक मिळविले. या




स्पर्धेमध्ये १० शाळांनी सहभाग घेतला होता. स्पर्धेत मतिमंद प्रवर्ग आणि कर्णबधिर प्रवर्ग होते. यामध्ये कर्णबधिर प्रवर्गातून रोटरी कर्णबधीर शाळेच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेले 'शिवतांडव' नृत्य प्रथम क्रमांकाचे मानकरी ठरले. हे नृत्य शाळेच्या विशेष शिक्षिका कुंदा शेवाळे यांनी बसवले होते. तसेच विशेष सहकार्य मनिषा गुंजाळ, संजय होन, अशोक दहातोंडे, उषा पाटील, वासंती पाटील ह्या शिक्षक-शिक्षकेतर कर्मचार्यांचे मिळाले. तसेच रेश्मा नाईक, साक्षी नाईक, तृप्ती राणे, संजना कांबळे, शैला वाघ, संजना सालेकर ह्या पालकांनी विशेष सहकार्य केले. अशा पध्दतीने शाळेच्या प्र. मुख्याध्यापिका शैला बंदसोडे यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेने क्रिडा व सांस्कृतिक स्पर्धेत अद्वितीय आणि अविस्मरणीय यश प्राप्त केले.

ट्रस्टचे चेअरमन अरविंद सावळेकर, सेक्रेटरी प्रमोद वालेकर तसेच क्लबचे अध्यक्ष डॉ. जय भंडारकर, सेक्रेटरी ऋग्वेद कांडपिळे सर्व ट्रस्टींनी आणि रोटेरियन्सनी विद्यार्थ्यांचे व मुख्याध्यापिकांसह सर्व शिक्षकांचे मनःपूर्वक अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

## नवी मुंबई महापालिका शाळांच्या विद्यार्थ्यांना 'इस्रो'ची सहल

**नवी मुंबई : बातमीदार**

शालेय विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची आवड रुजावी, भविष्यातही विज्ञान विषयाचा अभ्यास करण्याची रुची त्यांच्यात निर्माण व्हावी यासाठी नवी मुंबई महापालिकेने नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्याचे ठरविले आहे. नवी मुंबई महापालिका शाळेतील ज्या विद्यार्थ्यांना विज्ञान, गणित यांसारख्या विषयांमध्ये शिष्यवृत्ती मिळाली आहे, अशांना महापालिकेने भारतीय अंतराळ संशोधन संस्थेची (इस्रो) सहल घडविण्याचा निर्णय महापालिका प्रशासनाने घेतला आहे. यासाठी इयत्ता पाचवी आणि आठवीच्या विद्यार्थ्यांची निवड केली जाणार आहे.

शालेय वयात विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन तयार व्हावा यासाठी नवी मुंबई महापालिकेच्या शिक्षण विभागामार्फत वैविध्यपूर्ण उपक्रम राबविले जातात. विशेष म्हणजे ज्या विद्यार्थ्यांना विज्ञानाची आवड आहे, ते विद्यार्थी या उपक्रमात स्वत:हून सहभागी होताना दिसतात. शहरात भविष्यात वैज्ञानिक घडावेत यासाठी नवी मुंबई महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांसाठी विज्ञान सहल काढली जाते. या सहलीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध विषय समजतात. या उपक्रमाशी निगडित पालिकेने आणखी एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. ज्या विद्यार्थ्यांना विज्ञानाची आवड आहे, विज्ञान विषयाचे उत्तम ज्ञान आहे तसेच विज्ञान विषयात उत्तम गुण प्राप्त झाले आहेत तसेच शिष्यवृत्ती मिळालेली आहे, अशा नवी मुंबई महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांसाठी इस्रोची सहल आयोजित केली जाणार आहे.

ही सहल पाचवी आणि आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी असेल. या उपक्रमासाठी १९१ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. यातील ३७ विद्यार्थी शिष्यवृत्ती मिळालेले आहेत. तर उर्वरित १५४ विद्यार्थी हे मेरिट स्कॉलरशिप मिळालेले आहेत.

**ज्या विद्यार्थ्यांना विज्ञान विषयाची आवड आहे, अशा विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी नवी मुंबई महापालिकेने इस्रोची सहल घडविण्याचा निर्णय घेतला आहे. शहरात भविष्यात वैज्ञानिक घडतील असा यामागचा मुख्य उद्देश आहे.**

**-योगेश कडूसकर,** शिक्षणाधिकारी, नवी मुंबई महापालिका



## थंडीमुळे ड्रायफुट्सला मागणी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

गेल्या काही दिवसांपासून तापमानात घट झाल्याने थंडीची चाहूल लागली आहे. त्यामुळे आरोग्यासाठी पौष्टिक मेथी लाडूसह सुकामेवा अर्थात ड्रायफ्रुट्ला मागणी वाढली आहे. त्यामुळे गेल्या वर्षीच्या तुलनेत अंजीर, काजूच्या दरात वाढ झाली आहे. तर पिस्ता, बदाम जर्दाळूच्या दरात मात्र घसरण झालेली आहे.

पावसाळा लांबल्याने यंदा थंडी सुरू होण्यास विलंब झाला आहे. मात्र, गेल्या काही दिवसांत तापमानात घट होत असल्याने बचावासाठी आत्तापासून तयारी केली जात आहे. या काळात शरीरातील उष्मा वाढीसाठी ड्रायफ्रुट्स अधिक परिणामकारक ठरतात. त्यामुळे आरोग्य संवर्धनासाठी आवश्यक अशा पदार्थांना मागणी वाढली आहे. तसेच ऊर्जा निर्माण करणाऱ्या मेथीचे, सुका मेव्याचे लाडू, बदाम, काजू, अक्रोड, जर्दाळू, खोबरे, खारीक, डिंक, गोडंबी, पिस्ता, अंजीर, मेथी दाणा आदींना विशेष मागणी आहे. सध्या बाजारात मेथी तसेच डिंकाचे लाडूचे भाव स्थिर असून ६०० रुपये किलोने विक्री होत आहे. तर काजू, अंजीरच्या दरात वाढ झाली आहे.



### खारीकच्या दरात घसरण

**जर्दाळूसह अन्य काही मालाचे भाव काहीसे वधारले आहे. यासह मेथी दाणा १२० रुपये किलो, खसखस २४०० रुपये किलो, काळे मनुके ६०० ते ७०० रुपये, लाल मनुके ९०० ते १००० रुपये थंडीची चाहूल लागल्यापासून सुका मेव्याला मागणी आहे.**

### ड्रायफ्रुट्सचे भाव किलोप्रमाणे

बदाम - ६४० ते ८२०, काजू - ५०० ते ८५०, मनुके - ४०० ते ४५०, पिस्ता - ८५० ते १५००, अंजीर - ८५० ते १५००, जर्दाळू - ६०० ते ९००, खोबरे - ११० ते १३०, खारीक - १०० ते ३५०, अक्रोड - ६०० ते १०००, डिंक लाडू - ५६०, मेथी लाडू - ५६०





**पनवेल : तालुक्यातील वाकडी येथील ईच्छापूर्ती दत्तमंदिरात माजी नगरसेविका दर्शना भोईर यांच्या उपस्थितीत दत्तजयंती सोहळा झाला. या वेळी मंदिराच्या विश्वस्त मेघा यशवंत हुद्दार, इंदुमती हुद्दार, रोशनी खिस्मतराव, विद्या वाकडीकर, ललिता हुद्दार, सुनंदा पाटील, उज्वला कडू, रचना हुद्दार, चित्रा म्हात्रे, सपना पाटील, विरा पाटील आदी उपस्थित होत्या.**

## बेकरी आणि चॉकलेट्स उत्पादकांवर करडी नजर

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नव्या वर्षाच्या स्वागतासाठी नवी मुंबईकर तयारीला लागले आहेत. नव्या वर्षाच्या पूर्वसंध्येला होणाऱ्या सेलिब्रेशनसाठी नागरिक केक, चॉकलेट, शीतपेये यांची मागणी अधिक असते. याचा फायदा घेत काही जण अनेक पदार्थांमध्ये भेसळ करतात आणि भेसळयुक्त खाद्यपदार्थ, बनावटी मद्य आणि शीतपेये विकतात. यासाठी अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) बेकरी, चॉकलेट, शीतपेये आणि दारू बनवणाऱ्या आणि विकणाऱ्या आस्थापनांवर करडी नजर ठेवली आहे. यासाठी विशेष मोहीम अभियान राबवले जाणार आहे.

सणासुदीच्या काळात नागरिकांना चांगले आणि सुदृढ आहार, खाद्यपदार्थ मिळावेत, हे सुनिश्चित करण्यासाठी एफडीए वेळोवेळी भेसळ करणाऱ्यांविरोधात कारवाई अभियान राबवत असते. याअंतर्गत गणेशोत्सव, दिवाळी आणि दसऱ्यानंतर आता एफडीएने नव्या वर्षांच्या पूर्वतयारी ते तपासणी अभियान सुरू केले आहे. एफडीएच्या सहायक आयुक्त शैलेश आढाव यांनी सांगितले की, हे विशेष अभियान ३१ डिसेंबरपर्यंत सुरू राहणार आहे.

नव्या वर्षात चॉकलेट, बिस्किट, केक, पेस्ट्री, मद्य, शीतपेये आणि बेकरी उत्पादनाची जास्त विक्री होते. यासाठी सर्व १३ अन्न निरीक्षकांना त्यांच्या परिसरातील सर्व आस्थापनांवर तपासणी करण्याचे आदेश देण्यात आले आहे. या तपासणीत आस्थापनेतील खाद्यपदार्थ किंवा मद्य कमी दर्जाचे आढळले, तर संबंधित सर्व पदार्थ जप्त करून त्या पदार्थांचे नमुने एफडीएच्या प्रयोगशाळेत पाठवले जातील.

### पार्टीसाठी घ्यावी लागणार परवानगी

नव्या वर्षाच्या स्वागतासाठी अनेक ठिकाणी पार्ट्यांचे आयोजन केले जाते. यात मद्य, शीतपेयांचा वापर केला जातो. त्यामुळे एफडीएने अशा पार्टीच्या आयोजनापूर्वी १८००२२२३६५ या क्रमांकावर संपर्क करून परवानगी घ्यावी. ज्यामुळे, नव्या वर्षाच्या पार्टीत कोणत्याही प्रकारची समस्या उद्भवणार नाही.

## निवडक



### अलिबागमध्ये इमेज कॅलेंडरचे प्रकाशन

**अलिबाग** : इमेज कॅलेंडरचे प्रकाशन बुधवारी (दि. २७) कुरूळ येथील श्री कृष्ण सावरकर सभागृहात करण्यात आले. नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप नाईक, माजी जि. प. सदस्य द्वारकानाथ नाईक, सहयोग नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन योगेश मगर, जयहिंद लोकचळवळीचे कोकण समन्वयक अ‍ॅड. प्रथमेश पाटील, मंदार गडकरी, दीपिका झेंडे आदींसह छायाचित्रकार, नागरिक या समारंभास उपस्थित होते. समीर भायदे, विकास पाटील, अमेय नाझरे, तुषार थळे, अतुल झेंडे, निलेश दुदम, पौर्णिमा रोकडे, अमोल नाईक, आकाश थळे, महेश मुसळे, अतुल वर्तक, अंजली ठोकळ यांच्या छायाचित्रांची निवड इमेज कॅलेंडरमध्ये करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक समीर मालोदे यांनी तर सुत्रसंचलन सुयोग आंग्रे यांनी केले.

### वेशभूषा स्पर्धेत चांद्रयानाची प्रतिकृती



**चौक** : प्राथमिक विद्यामंदिर आणि शिशूमंदिर चौक शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. सांस्कृतिक कार्यक्रम, क्रीडा स्पर्धा, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा आणि वेशभूषा स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. वेशभूषा स्पर्धेत अनेक विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या वेशभूषा सादर केल्या. भारताचे यशस्वी अभियान चांद्रयान-३ या मोहिमेची प्रतिकृती मानस निखिलेश देशमुख याने साकारली होती. चांद्रयानाची प्रतिकृती सादर करून देशाचे उज्ज्वल भवितव्य यावर त्याने भाष्य केले.

### खोपोलीत बगळ्याला दिले जीवदान

**खोपोली** : शहरातील सीतानगर भानवज भागात हेमंत सोनवणे यांना ५० फुटांहून जास्त उंचीवरच्या केबलच्या हुकमध्ये बगळा अडकून फडफडत असलेला दिसला. त्यांनी केशव पाटील यांच्या मदतीने त्याला सोडविण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांना यश आले नाही. त्यांनी खोपोली नगरपालिकेच्या अग्निशमन दलाला या बाबत माहिती दिल्यानंतर ताबडतोब अग्निशमन दलाचे जवान त्या ठिकाणी दाखल झाले आणि त्या बगळ्याची सोडवणूक केली. बगळ्याच्या पंखाला गंभीर जखम झाल्याने त्याला उडता येत नसल्याने हेमंत सोनवणे यांनी त्याला सचिन पवार यांचे माध्यमातून अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजिक संस्थेच्या गुरुनाथ साठेलकर यांच्याकडे सुपूर्द केले आहे. बगळ्यावर प्राथमिक उपचार केले असून तो पूर्णपणे बरा झाल्यानंतर त्याला त्याच्या अधिवासात मोकळे केले जाणार असल्याची माहिती साठेलकर यांनी दिली.



### मंत्री रवींद्र चव्हाण रायगड दौऱ्यावर

**रायगड** : राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण हे गुरुवारी (दि.२८) रायगड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहे. सकाळी १०.३० वा. शासकीय रुग्णालय पाली येथे भूमिपूजन, दुपारी १२ वा. पेडली नवघर रस्त्यावरील लहान पुलाच्या बांधकामाचे भूमिपूजन, २.३० वा. बोरगाव, पेण येथे पुलाच्या बांधकामाचे भूमिपूजन, ३ वा. पेण शहरालगत असणाऱ्या भुंड्या पुलाच्या बांधकामाचे भूमिपूजन, अंतोरा पुलाच्या बांधकामाचे भूमिपूजन, सायंकाळी ४.१५ वा. खरोशी दूरशेत पुलाच्या बांधकामाचे भूमिपूजन, सायंकाळी ५ वा. रावे येथील पुलाच्या बांधकामाचे व पाणीपुरवठा योजनेतील टाकी बांधकामाचे भूमिपूजन, सायंकाळी ६ वा. पलावा डोंबिवलीकडे प्रयाण असा त्यांचा दौरा असणार आहे.

# रायगडातील पर्यटनस्थळांसह तीर्थक्षेत्रांवरही गर्दी





**पाली : प्रतिनिधी**

नाताळाच्या सुट्ट्यांचा पर्यटनासाठी पुरेपूर फायदा घेण्यासाठी पुणे-मुंबईसह महाराष्ट्रातील निरनिराळ्या ठिकाणच्या पर्यटकांची पावले जिल्ह्यातील पर्यटनस्थळांकडे स्थिरावली आहेत. शनिवारपासूनच जिल्ह्यातील विविध समुद्रकिनारे व पर्यटनस्थळांसह विविध तीर्थक्षेत्रांवरही गर्दी वाढली आहे.

येथील समुद्रकिनारे, मंदिरे, ऐतिहासिक वास्तू, किल्ले, तीर्थक्षेत्र पाहण्यासाठी पर्यटकांसह पर्यटक तसेच शाळकरी व महाविद्यालय सहली, विद्यार्थ्यांचा ओघ वाढत आहे. यामुळे पर्यटनावर अवलंबून असलेले हॉटेल व्यावसायिक, खानावळी, दुकानदार यांची सध्या चलती आहे.

अलिबाग, नागाव, वरसोली, मुरुड, काशिद, श्रीवर्धन, दिवेआगर, हरिहरेश्वर येथील समुद्रकिनारे पर्यटकांना भुरळ घालत आहे. सर्वच किनाऱ्यांवर बोटींग, घोडागाडी, बाईक राईडची मजा पर्यटक लुटत आहेत. सर्वच ठिकाणची बुकींग फुल्ल झाली असली तरीदेखील काही हॉटेल व कॉटेजमध्ये ऐन वेळी येणाऱ्या पर्यटकांना राहण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. काही हॉटेलमध्ये खास सूट व आकर्षक ऑफर दिल्या आहेत. ज्यामध्ये राहणे व खाण्यासाठी विशेष कुपनची व्यवस्था करण्यात आली आहे.

## हॉटेल, कॉटेज हाऊसफुल्ल

शिवाजी महाराजांच्या स्वराज्याची राजधानी असलेल्या रायगड किल्ल्यावर शिवप्रेमी मोठ्या संख्येने येत आहेत. गडावर जाण्यासाठी अनेकजण रोपवेला पसंती देत आहेत. त्यामुळे काही काळ रोपवेवर रांगा लावाव्या लागत आहेत. राज्यभरातून शाळेतील विद्यार्थीसुद्धा सहलीसाठी रायगड किल्ल्यावर मोठ्या प्रमाणात येत आहेत.

अष्टविनायकांपैकी दोन गणपती हे रायगडमध्ये आहेत. ते म्हणजे खालापूर तालुक्यातील महडचा वरदविनायक आणि सुधागड तालुक्यातील पालीचा बल्लाळेश्वर, सध्या येथे भाविकांची दर्शनासाठी रीघ लागलेली आहे. आलेल्या भक्तांची राहण्याची सोय करण्यासाठी बल्लाळेश्वर देवस्थानच्या वतीने दोन भक्तनिवासमध्ये अतिशय अल्पदरात चांगली व्यवस्था करण्यात येते. भक्तनिवास भरले तरी इतर खाजगी लॉजदेखील उपलब्ध आहेत.

अनेक भक्त महडच्या वरदविनायकाचे दर्शन घेऊन पालीच्या बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी येतात. मंदिराच्या आसपास असलेली फुल, हार, नारळ, प्रसाद, पुजेचे साहित्याची दुकाने सजली आहेत.

उरण जवळील घारापुरी लेणी पाहण्यासाठी कलाप्रेमींची गर्दी होत आहे. येथे जाण्यासाठीही उरण व गेटवे ऑफ इंडियाकडून फेरीबोटीची सेवा उपलब्ध आहे. महाडजवळील प्रसिद्ध गांधारपाले लेणी, चवदार तळे, समर्थ रामदास स्वामींनी दासबोध लिहिला ते निसर्गरम्य शिवथरघळ, जिजाऊंची समाधी, पोलादपूर येथील तानाजी मालुसरे याचे उमरठ गाव, रेवदंडा बिच व किल्ला, उन्हेरे येथील गरम पाण्याचे कुंड, खालापूर तालुक्यातील उंबरखिंड, खांदेरी, उंदेरी किल्ला अशा स्थळांनाही पर्यटक भेट देत आहेत.

## डोणवत ग्रामस्थांनी घेतली आमदार महेंद्र थोरवे यांची भेट; विकासाच्या प्रश्नावर चर्चा

**खोपोली : प्रतिनिधी**



डोणवत ग्रामस्थांनी गावाच्या वेगवेगळ्या विकासाच्या प्रश्नावर नुकतीच आमदार महेंद्र थोरवे यांची भेट घेतली. डोणवत गावासाठी विकासनिधीची कमतरता कमी पडू देणार नसल्याचे या वेळी आश्वासन आमदार थोरवे यांनी दिले.

डोणवत गावासाठी आमदारांच्या माध्यमातून जलजीवन मिशन अंतर्गत पाणी योजना मंजूर करण्यात आली आहे. त्या योजनेचे काम जलद आणि योग्य पद्धतीने होण्यासाठी चर्चा करण्यात आली, तसेच डोणवत धरण हे मुशी डॅमच्या धर्तीवर विकसित होण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली. डोणवत ते गोरठण गावाच्या मधोमध राज्यमार्गावर असणाऱ्या अरूंद पुलामुळे वाहधराकांना अडचणी निर्माण होत असल्याने याठिकाणी नवीन पूल उभारण्याची मागणी पत्र देण्यात आले.

बाळगंगा नदी संवर्धनासाठी गाळउपसा करून नदीचे खोलीकरण करण्याची मागणीचे निवेदन देण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक, शिवस्मारक, बसस्थानक, उद्यान, व्यायामशाळा, डम्पिंग ग्राउंड आदी मुद्द्यावर या वेळी सकारात्मक चर्चा झाली. विधानसभा प्रवक्ते अ‍ॅड. अमोलराजे बांदल-पाटील यांच्या नेतृत्वाखाली ग्रामस्थ रामदास चव्हाण, ज्येष्ठ पत्रकार सुधीर देशमुख, जयेश पाटील, सचिन मोरे, अमोल भापकर, राजू यादव, सत्री साळुंखे, सागर चव्हाण, भीमराव आदी उपस्थित होते. अमोल भापकर यांनी आमदार महेंद्र थोरवे यांना श्रीमद् भगवत गीता भेट म्हणून दिली.

## कठोर मेहनतीला पर्याय नाही -कविता राऊत

**माणगाव : प्रतिनिधी**



कठोर मेहनतीला पर्याय नाही, असे प्रतिपादन आंतरराष्ट्रीय धावपटू कविता राऊत यांनी वनवासी कल्याण आश्रम महाराष्ट्र संचालित कै. विजया गोपाळ गांधी अनुदानित प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळेच्या २४व्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी काढले. मंगळवारी (दि. २६)झालेल्या कार्यक्रमात बोलताना त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

वनवासी कल्याण आश्रम शाळा माणगावचे शालेय समिती अध्यक्ष महादेव जाधव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात भाजप दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील, जेसन पॉलिमर प्रा. लि. विळे एमआयडीसी डायरेक्टर लक्ष्मण जाधव, संकुल समिती अध्यक्ष ठमाताई पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत स्नेहसंमेलनाचे उद्घाटन झाले.

या वेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला. आंतरराष्ट्रीय धावपटू कविता राऊत यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शनात कठोर मेहनतीला पर्याय नसल्याचे सांगून विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक केले. माजी आमदार धैर्यशील पाटील व लक्ष्मण जाधव यांनीही विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक करून स्नेहसंमेलनास शुभेच्छा दिल्या. विद्यालयाचे मुख्याध्यापक उत्तम पाटील, अरुण पाटील तसेच संकुल समिती अध्यक्ष ठमाताई पवार, महादेव जाधव आदींनी मार्गदर्शन केले.

संस्कृतिक विभाग प्रमुख काशिनाथ गाणेकर व विद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक विद्यार्थी उपस्थित होते. रात्री विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम अत्यंत उत्साहात झाला, तसेच बुधवारी (दि. २७) विद्यार्थ्यांनी आनंद बाजाराचा आस्वाद घेतला. त्यामध्ये खरेदी-विक्रीचा अनुभव घेऊन विविध प्रकारचे खाऊचे स्टॉल्स विद्यार्थ्यांनी मांडले होते.

## सर्पमित्रांनी दिले विषारी नागाला जीवदान



**खोपोली : प्रतिनिधी**

चौक गावात कुंपणाला लावण्यासाठी असलेल्या आणि अडगळीत ठेवलेल्या जाळीत अडकलेल्या नागाची सुखरूप सुटका केली.

रोहिदास म्हसणे यांना जाळीत साप अडकल्याची माहिती मिळताच ते त्या ठिकाणी पोचले. जाळीत अडकलेला नाग असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी तातडीने नवीन मोरे आणि सुनील पुरी यांना मदतीसाठी बोलावून घेतले. त्या तिघांनी मिळून अत्यंत कुशलतेने त्या नागाला कोणतीही इजा न होता व्यवस्थित जाळ्यातून सोडवण्यास सुरुवात केली.

जाळीमध्ये जेरबंद झालेल्या विषारी नाग रोहिदास, नवीन आणि सुनील त्यांच्यावर वारंवार जीवघेणा हल्ला करीत होता, मात्र तिघांनी स्वतःचा बचाव करत शिताफिने आणि सुरक्षेची साधने वापरून त्याला जीवदान देण्याचे कर्तव्य पार पाडले.

या कामगिरीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावणारे नवीन मोरे आणि सुनील पुरी हे अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजिक संस्थेचे फ्रंटलाईन वर्करदेखील आहेत.

## पेण एज्युकेशन सोसायटीतर्फे पारितोषिक वितरण





**पेण : प्रतिनिधी**

आगामी काही वर्षांच्या कालावधीत विद्यार्थ्यांचे हित पाहता व नवीन शैक्षणिक धोरणानुसार लॉ कॉलेज व मेडिकल, इंजिनिअर यांसारखे कॉलेज नव्याने सुरू करणार, असे प्रतिपादन पेण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अ‍ॅड. मंगेश नेने यांनी केले.

पेण एज्युकेशन सोसायटीची प्राथमिक शाळेचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ मोठ्या उत्साहात झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष अ‍ॅड. मंगेश नेने तर प्रमुख पाहुणे संस्थेचे माजी अध्यक्ष तथा सोबती संघटनेचे अध्यक्ष अ‍ॅड. बापूसाहेब नेने होते. या वेळी संस्थेचे माजी कार्याध्यक्ष वसंत आठवले, कार्याध्यक्ष प्रशांत ओक, उपकार्याध्यक्ष संजय कडू, सेक्रेटरी सुधीर जोशी, सदस्या डॉ. नीता कदम, आश्विनी शहा, हेमंत वडके, माजी मुख्याध्यापिका कलावती पाटील, मुख्याध्यापिका विद्या घरत, मुख्याध्यापिका लेखा ठाकूर, शिक्षक प्रतिनिधी सुषमा साखरे यांच्यासह शाळा व्यवस्थापन समिती शिक्षक पालक संघ आदी मान्यवर उपस्थित होते.

शाळेच्या विविध स्पर्धा परीक्षेत सुयश मिळविल्याबद्दल विद्यार्थ्यांचा ट्रॉफी देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

मुख्याध्यापिका लेखा ठाकूर यांनी शाळेच्या विविध उपक्रमाची व प्रगतीची माहिती सांगितली. निव्या टेमघरे या विद्यार्थीनीने साने गुरूजींविषयी सुंदर आवाजात माहिती व बोधकथा सांगितली. सूत्रसंचलन रूचा परांजपे यांनी तर आभार सारा पाटील यांनी केले.

# रोह्यात विविध ठिकाणी श्री दत्तजयंती उत्साहात साजरी

**धाटाव : प्रतिनिधी**



सालाबादप्रमाणे यंदाही भुवनेश्वर पंचायत समिती येथील रामप्रकाश कुशवाह यांच्या निवास्थानालगत श्रीदत्त मंदिरात मंगळवारी (दि. २६) श्री दत्तजयंती उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यंदा ४०व्या वर्षात पदार्पण करीत असलेल्या या उत्सवानिमित्त श्रीसत्यनारायण महापुजेसह विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते, अशी माहिती सत्यदेव कुशवाह यांनी दिली तर सायंकाळी भाविकांनी दर्शन व महाप्रसादाचा लाभ घेतला. उत्सवसोहळा यशस्वी करण्यासाठी मंदिराचे विश्वस्त रामप्रकाश कुशवाह यांच्या मार्गदर्शनाखाली सत्यदेव, रामेश्वर व अ‍ॅड. महेश यांच्यासह संपूर्ण कुशवाह परिवार परिश्रम घेतले.

रौप्य महोत्सवी श्री दत्तजयंती उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. त्यानिमित्त श्रीसत्यनारायण महापुजा आणि महाप्रसादासह विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते, तर भाविकांनी कोरोना पार्श्वभूमिवर सुरक्षितता बाळगून दर्शन घेऊन तिर्थप्रसादाचा लाभ घेतला, तसेच हा धार्मिक उत्सव सोहळा यशस्वी करण्यासाठी सल्लागार दिलीप पारेकर, संजय पालकर, ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष संदीप पालकर, किल्ला ग्रा. पं. सदस्य नरेश चांदोरकर, गणेश चांदोरकर, अशोक चांदोरकर, जितेंद्र पालकर, विनोद चांदोरकर यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळाचे पदाधिकारी आदींसह ग्रामस्थ आणि ओमकार मित्र मंडळाचे सदस्य परिश्रम घेतले.

धाटाव स्टॉप येथील उद्योजक बापुशेठ लिंबोरे यांच्या निवासस्थानी श्रीदत्त मंदिरात उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

या उत्सवानिमित्त श्री सत्यनारायण महापुजेसह विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती सचिन लिंबोरे यांनी दिली. भाविकांनी दर्शन व तीर्थ, महाप्रसादाचा लाभ घेतला तर हा धार्मिक उत्सव सोहळा यशस्वी करण्यासाठी लिंबोरे परिवारांनी परिश्रम घेतले.

त्रिमूर्ती नगर, दमखाडी येथील श्रीदत्त मंदिरात उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. श्री सत्यनारायण महापुजेसह विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. धाटाव पोलीस आऊट पोस्ट, एक्सेल स्टॉप, रोहा श्रीदत्त मंदिरात जयंती उत्सवानिमित्त श्री सत्यनारायण महापुजेचे आयोजन करण्यात आले होते तर असंख्य श्रीदत्त भाविकांनी दर्शन घेतले.

पिंगळसई येथे ४०वे वर्षे निमित्ताने पहिल्या दिवशी श्रीदत्त जयंतीनिमित्त हभप पुरुषोत्तम महाराज यांचे श्री दत्त जन्मकिर्तन व रात्री सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले. तर या कार्यक्रमाचे आयोजन ग्रामस्थ मंडळ व महिला मंडळ पिंगळसई, जाणकार मित्र मंडळ यांनी आयोजित केले होते. लांढर येथे श्रीदत्त मंदिरामध्ये धाटाव विभागातील तळाघर, लांढर, वाशी, महादेववाडी कारिवने येथील असंख्य भाविकांनी दर्शन घेतले.

## अलिबागमध्ये राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा

**अलिबाग : प्रतिनिधी**


सिद्धाश्रम सेवा मंडळ व गणराज प्रबोधन मंडळ यांच्या विद्यमाने अलिबाग येथे १२ जानेवारी २०२४ रोजी महर्षी न्यायरत्न विनोद राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली. स्पर्धा खुल्या गटासाठी असून, १५ वर्षे वय पूर्ण असणाऱ्या कोणालाही स्पर्धेत सहभागी होता येईल.

आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा भविष्यात मानवी जीवनावर होणारा परिणाम, श्री राम चरित्रातून आपण काय शिकावे?, ज्येष्ठ नागरिक ही समाजाची संपत्ती की जबाबदारी?, नियंत्रणहीन दृकश्राव्य माध्यमांचा समाज मनावर होणारा परिणाम, लोकशाही मूल्यांचे जतन करण्यासाठी नागरिकांचे योगदान हे विषय स्पर्धेसाठी ठेवले आहेत. प्रथम पाच क्रमाकांना पाच हजार ते एक हजार व प्रमाणपत्र असे पारितोषिके ठेवण्यात आली आहेत. स्पर्धेचे उद्घाटन अलिबाग येथील जेएसएम कॉलेज येथे सकाळी ९.३० वाजता होणार आहे.

स्पर्धेचे माध्यम मराठी आहे. प्रत्येक स्पर्धकास नियोजित विषयावरील वक्तृत्व सादरीकरणासाठी ५+२ =७ मिनिटे वेळ दिला जाणार आहे. प्रत्येक सहभागी स्पर्धकाला सहभाग प्रमाणपत्र देण्यात येईल. अधिक माहिती अ‍ॅड. श्रीराम ठोसर (९८२३२७९०४६), अ‍ॅड. अदिती वैद्य (९८९०८६३२३२) यांच्याशी संपर्क साधावा.

# पुणेरी पलटणकडून पाटणा पायरेट्सचा पराभव

**प्रो कबड्डी लीग**



**चेन्नई : वृत्तसंस्था**

येथे मंगळवारी (दि. २६) झालेल्या प्रो कबड्डी लीग सामन्यात पुणेरी पलटणच्या प्रत्येक सदस्याने सात गुण मिळवून पटना पायरेट्सचा ४६-२८ असा पराभव केला. पंकज मोहिते सुपर टेनसह चमकला आणि अबिनेश नादराजनने हाय-फाइव्ह नोंदविल्यामुळे पुणेरी पलटणने पटना पायरेट्सवर ४६-२८ असे वर्चस्व गाजवले.

गेल्या आठवड्यात घरच्या मैदानात सलग तीन सामने जिंकल्यानंतर प्रथमच मॅटवर उतरलेल्या पलटनची सुरुवातही चांगलीच झाली होती. त्यांच्या चढाई आणि बचावात्मक युनिट्सनी एकजुटीने त्यांना विजयापर्यंत नेजे कारण त्यांनी चार मिनिटांत ६-१ अशी आघाडी घेतली.

सचिन तन्वरने सुपर टॅकल लागू केल्यावर आणि मनजीत दहियाने मल्टिपॉईंट रेड घेऊन आल्यावर पायरेट्सने आश्वासन दिले, परंतु मोहितेने केलेल्या उत्कृष्ट चढाईनंतर पुनरागमनाच्या त्यांच्या आशा धुळीला मिळाल्या.

२४ वर्षीय खेळाडूने सुपर रेडसाठी पाच बचावपटू मागे टाकले. त्यानंतर लगेचच ऑलआऊट झाला कारण पुणेरी पलटनने १० मिनिटांनंतर १४-८ अशी आघाडी घेतली. फुशारकी मारण्यासाठी सुरुवातीच्या आघाडीसह, पलटन रेडर्सनी २२-१५ अशी आरामदायी आघाडी घेऊन हाफ टाईममध्ये सहज गुण मिळवणे सुरूच ठेवले.

पुणेरी पलटणने फटकेबाजी सुरू ठेवल्याने उत्तरार्धात एकेरी वाहतूक होती. त्यांचा इराणी अष्टपैलू मोहम्मदरेझा शादलौईने रेडरच्या भूमिकेत एक शो सादर केला आणि दोन छाप्यांमध्ये चार गुण मिळवले, ज्यामध्ये सुपर रेडचा समावेश होता. त्यानंतर शदलौईने एकट्याने आणखी एक ऑलआउट पूर्ण केले कारण त्याने सुधाकर एमला दुहेरी घोट्याच्या पकडीत पायचीत केले आणि पलटनची आघाडी ३८-२२ अशी १६ गुणांपर्यंत वाढली.

मोहित गोयतने नऊ गुण मिळविल्यामुळे पलटनच्या प्रत्येक सदस्याने सात गुण मिळवले, तर शदलौई आणि कर्णधार अस्लम इनामदार यांना प्रत्येकी सहा गुण मिळाले कारण त्यांनी तीन वेळच्या चॅम्पियनवर १८ गुणांनी विजय मिळवला. या विजयामुळे पुणेरी पलटणने गुणतालिकेत अव्वल स्थान निश्चित केले आहे आणि आतापर्यंत सात फेऱ्यांनंतर सहा सामने जिंकणारा तो एकमेव संघ आहे.

# के. एल. राहुलचे एकाच मैदानात दोनदा शतक



**दक्षिण आफ्रिका (गौतेंग) : वृत्तसंस्था**

के. एल. राहुलने १३३ चेंडूत आपल्या कसोटी कारकिर्दीतील आठवे शतक झळकावले. सेंच्युरियनमध्ये दुसऱ्यांदा शतक झळकावत लोकेश राहुलने एक नवा इतिहास रचला आहे. अशी कामगिरी करणारा तो पहिला खेळाडू ठरला आहे.

मधल्या फळीत फलंदाजी करीत एक विकेटकीपर म्हणून शतक झळकावणारा धोनी, दिनेश कार्तिक आणि ऋषभ पंतनंतरचा दुसरा खेळाडू बनला आहे. २०१४, २०२१-२० आणि आता २०२३-२४ बॉक्सिंग डे कसोटीत शतक कारणारा तो पहिला खेळाडू ठरला आहे. के. एल. राहुलने १३३ चेंडूत आपल्या कसोटी कारकिर्दीतील आठवे शतक झळकावले. त्याने आपल्या खेळीत १४ चौकार आणि चार षटकार मारले आहेत.

भारताने बुधवारी आठ विकेट्सवर २०८ धावांवर खेळण्यास सुरुवात केली. सिराजने काही चांगले शॉट्स मारले, मात्र ६६व्या षटकाच्या पहिल्या चेंडूवर सिराज २२चेंडूत पाच धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला. भारताने नऊ विकेट गमावल्या होत्या आणि प्रसिद्ध कृष्णा फलंदाजीला आला होता. कोएत्झीच्या षटकातील तिसऱ्या चेंडूवर प्रसिधने धाव घेतली. राहुलने चौथ्या आणि पाचव्या चेंडूवर मोठा फटका मारण्याचा प्रयत्न केला, पण तो फटकावता आला नाही.

राहुलने शेवटच्या चेंडूवर षटकार मारत शतक पूर्ण केले. सेंच्युरियनमधील राहुलचे हे सलग दुसरे कसोटी शतक आहे. २०२१मध्ये बॉक्सिंग डे कसोटीत राहुलने २४८ चेंडूत १२२ धावांची नाबाद खेळी खेळली होती. दक्षिण आफ्रिकेतील राहुलचे हे दुसरे कसोटी शतक ठरले.

**१४ वर्षाखालील मुलांची क्रिकेट स्पर्धा**

# पहिल्या डावाच्या आघाडीवर रायगडचा लातूरवर विजय

**आशीर्व पाटीलचे नाबाद शतक**

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनतर्फे कोल्हापूर येथे आयोजित १४ वर्षांखालील मुलांच्या आमंत्रितांच्या स्पर्धेत पहिल्या सामन्यात रायगडने लातूरवर पहिल्या डावाच्या आघाडीवर विजय मिळविला. रायगडच्या आशीर्व पाटील याने नाबाद शतक (१०२) झळकविले.



प्रथम फलंदाजी करताना लातूर संघाचा डाव ५८.४ षटकांत १३६ धावांवर आटोपला. रायगडकडून अथर्व पाटीलने १६ षटकात १८ धावा देऊन ४ बळी तर पंकज इटकर याने १४ षटकात ३२ धावा देऊन ३ बळी मिळवले. लातूरकडून राघव चाफे याने २१ धावा केल्या. १३६ धावांचे माफक आव्हान घेऊन उतरलेल्या रायगडला आशीर्व पाटील आणि पंकज इटकर यांनी ६६ धावांची भागिदारी करत सुस्थितीत नेले. रायगड संघाने पहिला डाव ९ बाद २३६ धावांवर घोषित केला.

आशीर्व पाटील याने संयमी फलंदाजी करीत २३४ चेंडूंचा सामना करुन नाबाद १०२ धावा केल्या. त्याने १२ चौकार लगावले. पंकज इटकरने ३८ धावा करीत त्याला चांगली साथ दिली. दुसऱ्या डावात लातूर संघाने २३ षटकात ३ बाद ४३ धावा केल्या.

# खालापुरातील कराटेपटूंचा तहसीलदारांकडून सन्मान

**चौक : प्रतिनिधी**

महाराष्ट्र अमॅचुर स्पोर्ट्स कराटे असोसिएशन महाराष्ट्र शासन आयोजित राज्यस्तरीय कराटे चॅम्पियन स्पर्धेत शतकोन कराटे स्पोर्ट्स खोपोलीच्या विद्यार्थ्यांनी चार प्रकारात १२० पदके जिंकली. यात ६४ सुवर्ण, ३० रौप्य व २६ कांस्यपदके प्राप्त करून रायगड जिल्ह्याचा नावलौकिक वाढविला आहे. कर्जत खालापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेंद्र थोरवे, उपविभागीय अधिकारी अजित नैराले, खालापूर तहसीलदार आयुब तांबोळी यांनी त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.



मास्टर ऑफ मास्टर ५ डिग्री ब्लॅक बेल्ट, भारत भूषण शितल गायकवाड, मास्टर विशाल गायकवाड, योगेश गायकवाड, विनया केदार-मुंडे, वर्षा उदूगडे, आदित्य महाडीक यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये अंकित चेऊलकर चार सुवर्णपदक, विर विकास गायकवाड तीन सुवर्ण एक कांस्यपदक, सार्थक गणेश शिंदे तीन सुवर्ण एक कांस्यपदक, निधी विकास शितोळे दोन सुवर्ण एक रौप्य पदक एक कांस्य पदक, श्रेया सोनू तिवारी दोन सुवर्ण दोन रौप्यपदक, शशांक विकास गायकवाड दोन सुवर्ण दोन रौप्यपदक, निलम कमलेश राठोड दोन सुवर्ण दोन कांस्यपदक, समृद्धी गणेश शिंदे दोन सुवर्ण एक रौप्य एक कांस्यपदक, रेहान फारुक पठाण दोन सुवर्ण दोन कांस्यपदक, अहमद उमर खान दोन सुवर्ण एक रौप्य एक कस्य पदक, सिद्धेश सतीश धामणकर दोन सुवर्ण एक रौप्य एक कांस्यपदक, गौरी नागनाथ मेटे दोन सुवर्ण दोन कांस्यपदक, विकास चौधरी दोन सुवर्ण दोन कांस्यपदक, ईश्वरी सचिन मोरे दोन सुवर्ण एक रौप्य एक कांस्यपदक, सुबोध गोपीनाथ सोनावणे दोन सुवर्ण दोन कांस्यपदक, वेद विकास म्हात्रे एक सुवर्ण पदक दोन रौप्य एक कांस्यपदक, शौर्य सोनू तिवारी एक सुवर्ण एक रौप्य दोन कांस्यपदक, अंशु कमलेश राठोर एक सुवर्ण एक रौप्य एक कांस्यपदक, अनिल शंकर जंगले एक सुवर्ण दोन रौप्य एक कांस्यपदक, अवनिश अनंत कदम एक सुवर्ण दोन रौप्य एक कांस्यपदक, आयुष्मी सत्यनारायण साहू एक तीन रौप्यपदक, हूरैन आफताब दळवी एक सुवर्ण तीन रौप्यपदक, ऋषम रवींद्र हेगडे एक सुवर्ण एक रौप्य दोन कांस्यपदक, प्रणय सचिन मोरे एक सुवर्ण एक रौप्य दोन कांस्यपदक, आयुष शेखर येरम एक सुवर्ण एक रौप्य एक कांस्यपदक, राजेश गंभीर एक सुवर्ण एक रौप्य दोन कांस्यपदक, कृष्णाई शेखर महाडिक एक सुवर्ण दोन रौप्य एक कांस्यपदक, अमृता अरुण साखरे एक सुवर्ण एक रौप्य दोन कांस्यपदक पटकाविले.

या मान्यता प्राप्त संस्थेला विद्यार्थ्यांना परीक्षेत शैक्षणीक गुण देण्याचा अधिकार आहे, असे खालापूर तहसीलदार आयुब तांबोळी यांनी सांगितले.

# कामगार कबड्डी स्पर्धेचा २ फेब्रुवारीपासून थरार

**मुंबई : प्रतिनिधी**

औद्योगिक व व्यावसायिक कामगारांसाठी २७वी आणि महिलांसाठी २२ वी राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा २ ते ५ फेब्रुवारी २०२४ दरम्यान आयोजित करण्यात आली आहे. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या प्रभादेवी येथील हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवनात या स्पर्धा रंगणार आहे.



तिन्ही गटातील अंतिम विजेत्या संघांना प्रत्येकी ५० हजार रुपये, उपविजेत्या संघांना प्रत्येकी ३५ हजार रुपये तर, अंतिम उपांत्य उपविजेत्या संघाना प्रत्येकी २० हजार रुपयांची बक्षीसे दिली जाणार आहेत. विजेत्या संघांना सांघिक चषक, खेळाडूंना पदके आणि प्रमाणपत्रे देऊन गौरवण्यात येईल.

मुंबई व ठाणे वगळता बाहेरगावाहून येणाऱ्या संघांना निवास व भोजन व्यवस्थेसाठी प्रतिदिन चार हजार रुपये तसेच महिलांच्या मुंबई व ठाणे येथील संघांना प्रतिदिन प्रवास खर्चासाठी एक हजार रुपये दिले जातील.

कामगार पुरुष संघासाठी ३०० रुपये, महिला संघासाठी २०० रुपये प्रवेश शुल्क असेल. प्रवेशिका व प्रवेश शुल्क हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, सेनापती बापट मार्ग, प्रभादेवी रेल्वे स्थानकाजवळ स्वीकारल्या जातील. जास्तीत जास्त संघांनी स्पर्धेत सहभाग घ्यावा, असे आवाहन मंडळातर्फे करण्यात आले आहे.

पुरुष शहरी, ग्रामीण आणि महिला अशा तीन गटात स्पर्धेचे सामने खेळवले जातील. प्रवेशिका स्वीकारण्याची अंतिम तारीख २० जानेवारी आहे. स्पर्धेच्या प्रवेशिका, नियमावली मंडळाचे संकेतस्थळ, राज्यातील सर्व विभागीय व गट कार्यालये, कामगार कल्याण केंद्रात उपलब्ध आहेत.

महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ अंतर्गत नोंदणीकृत असलेल्या विविध कंपन्या, कारखाने आदी आस्थापनांच्या पुरुष संघांना स्पर्धेत भाग घेता येणार आहे, तर महिला संघांसाठी ही स्पर्धा खुली असेल.

# महाराष्ट्रातील उदयोन्मुख व्हॉलिबॉल खेळाडूंसाठी दत्तक योजना

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

व्हॉलिबॉलचे राष्ट्रीय प्रशिक्षक अजित पाटील यांच्या दिशा अकॅडमी, बाचणी आणि भारतीय व्हॉलिबॉलप्रेमी संघटनेच्या वतीने महाराष्ट्रातील उदयोन्मुख व्हॉलिबॉल खेळाडूंसाठी दत्तक योजना सुरू करण्यात आली आहे. त्यात २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात उत्कृष्ट १० खेळाडू निवडून त्यांना दरमहा तीन हजार रुपये शिष्यवृत्ती दिली जाणार आहे.

खेळाडूंची निवड शारीरिक क्षमता चाचणीद्वारे केली जाणार असून १२ ते १४ वर्षे वयोगटातील खेळाडूंची निवड केली जाणार आहे. निवडलेल्या खेळाडूंच्या पालकांचे संमतीपत्र गरजेचे आहे. निवड झालेल्या खेळाडूंना व्हॉलिबॉलबरोबरच शालेय शिक्षण दिले जाणार आहे. हे खेळाडू दिशा अकॅडमी येथे निवासी संकुलात प्रवेशित केले जातील. त्यांना शास्त्रशुद्ध क्रीडा मार्गदर्शकांकडून प्रशिक्षण आणि सकस आहार दिला जाणार आहे. राज्य संघटना आणि शासकीय क्रीडा स्पर्धेतही त्यांना सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. यासंदर्भात अधिक माहितीसाठी मोबाईल (८४११९४४२४१)वर संपर्क करावा, असे आवाहन अजित पाटील यांनी केले आहे.

**कुमार-मुली (ज्युनिअर) राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धा**

# महाराष्ट्राच्या दोन्ही संघांची विजयी सलामी

**बेमेतरा (छत्तीसगड) : वृत्तसंस्था**

महाराष्ट्राच्या कुमार व मुली अशा दोन्ही संघांनी विदर्भावर मात करीत ४२व्या कुमार गट राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धेत विजयी सलामी दिली. बेमेतरा (छत्तीसगड)मधील बिजभाटच्या अलॉन्स पब्लिक स्कूल बिजाभटच्या मैदानावर ही स्पर्धा सुरू आहे.

या स्पर्धेत महाराष्ट्राच्या मुलींनी विदर्भावर २४-२० असा एक डाव राखून चार गुणांनी दणदणीत विजय मिळविला. महाराष्ट्राच्या अश्विनी शिंदे (३.१० मि. संरक्षण व ४ गुण ) व संध्या सुरवसे (३, नाबाद २.४० मि. संरक्षण) यांनी अष्टपैलू खेळी केली. सुहानी धोत्रे व प्रणाली काळे यांनी प्रत्येकी सहा गुण मिळवत संघाचा विजय डावाने सुकर केला. विदर्भाकडून कृतीकाने सहा गुण मिळवताना १.५० मिनिटे संरक्षण करीत एकाकी लढत दिली.

कुमार गटात महाराष्ट्राने विदर्भचा ३८-२६ असा १२ गुणांनी पराभव केला. मध्यंतरास महाराष्ट्राने १८-१२ अशी सहा गुणांची निर्णायक आघाडी घेतली होती. महाराष्ट्राच्या चेतन भिका व तेजस जाधव यांनी आपल्या धारदार आक्रमणात प्रत्येकी दहा गुण वसूल करीत संघाचा मोठा विजय निश्चित केला.

वैभव मोरे (२.२०, १.४० मि. संरक्षण व ४ गुण) व गणेश बोरकर (२ मि. संरक्षण व ४ गुण) यांनी अष्टपैलू खेळ करताना महाराष्ट्राच्या विजयात निर्णायक भूमिका निभावली. विदर्भाकडून के. अमनने (१.१०, १.३० मि. संरक्षण व ४ गुण) व सुमितने (सहा गुण) चांगली लढत दिली.

# अल्टीमेट खो-खो स्पर्धेत गुजरातची मुंबईवर मात



**भुवनेश्वर : वृत्तसंस्था**

अल्टीमेट खो-खोचा सीझन -२ कटक येथील जवाहरलाल नेहरू इनडोअर स्टेडियमवर सुरू आहे. मंगळवारी (दि. २६) झालेल्या सामन्यात गुजरात जायंट्सने मुंबई खिलाडीसचा ४ गुणांनी पराभव करीत गुणतालिकेत पहिले स्थान मिळवले.

मंगळवारी झालेल्या पाचव्या सामन्यात गुजरात जायंट्सने मुंबई खिलाडीसला ३४-३० (मध्यंतर १७-९) असे ४ गुणांनी पराभूत केले. मुंबई खिलाडीसचा कर्णधार अनिकेत पोटेने नाणेफेक जिंकून प्रथम संरक्षण घेतले. हा त्याचा निर्णय अतिशय योग्य ठरवत मुंबई खिलाडीसच्या संरक्षकांनी अतिशय उत्कृष्ट खेळ करीत पहिल्या टर्नमध्ये संरक्षणात ड्रीम रन्सचा १ गुण मिळवला, तर गुजरात जायंट्सने १४ गुण मिळवत खेळावर पकड मिळवली. त्यानंतर गुजराताने ड्रीम रन्सचे तीन गुण वसूल करताना मुंबई खिलाडीसला कडवी लढत दिली, मात्र या दुसऱ्या टर्नमध्ये मुंबई खिलाडीसला फक्त ८ गुणच मिळवता आले. या वेळी गुजरात कर्णधार अक्षय भांगरे १,१२ मि. संरक्षण सुयश गरगटे १.४८ मि. संरक्षण व अभिनंदन पाटील यांनी उत्कृष्ट संरक्षण केले.

दुसऱ्या डावात व तिसऱ्या टर्नमध्ये धमाकेदार खेळ करत गुजरातने मुंबईला तगडे आव्हान देत एक एक पाऊल विजयाकडे टाकत होते. गुजरातने एकूण ३४ गुण वसूल केले. त्यामुळे मुंबईची वाटचाल बिकट झाली. शेवटच्या टर्नमध्ये मुंबई खिलाडीसने जोरदार मुसंडी मारत सामन्यात परतण्याचा प्रयत्न केला मात्र त्यात ते सपशेल अपयशी ठरले. या सामन्यात गरगटेला संरक्षक पुरस्कार देऊन गौरविले.



**पनवेल : ठिकठिकाणी श्रीदत्त जयंतीनिमित्त उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी बामणडोंगरी येथील अंकुश ठाकूर यांच्यातर्फे आयोजित श्रीदत्त उत्सवास भेट देत गुरुमाऊलींचे दर्शन घेतले. या वेळी त्यांच्यासह ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख व इतर कार्यकर्ते उपस्थित होते. त्यांचा या वेळी ग्रामस्थांतर्फे स्वागत, सत्कार करण्यात आला.**





दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com